रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २७०
www.ramprahar.com

◆ रविवार, १९ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘एटीएस’संदर्भात वाहतूक व्यावसायिकांना दिलासा



**मुंबई :** एटीएस (ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन) प्रणालीतील तांत्रिक बदलांमुळे रखडलेली वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रिया आता पुन्हा मार्गी लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विनंतीनुसार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी या प्रक्रियेला ऑक्टोबर २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील रिक्षा, टेम्पो आणि स्कूलबससह सुमारे १५ लाख व्यावसायिक वाहतूकदारांना दिलासा मिळाला आहे. राज्यात राबविण्यात येत असलेल्या अद्ययावत एटीएस प्रणालीमुळे गेल्या काही काळापासून व्यावसायिक वाहनांच्या परवान्यांचे नूतनीकरण पूर्णतः बंद झाले होते. त्यामुळे रिक्षाचालकांपासून ते स्कूलबस मालकांपर्यंत सर्वांनाच कायदेशीर अडचणींना आणि आर्थिक दंडाला सामोरे जावे लागत होते. विनंतीचा सकारात्मक विचार करत केंद्राने मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे.

**अंतरंग**

खालापुरातील गुरूकुल संस्थेत अपहार; दोघांवर गुन्हा/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

स्मृती मानधना ठरली ‘टी-२० क्वीन’/८

# विरोधकांना पापाची शिक्षा मिळणार!

### महिला आरक्षणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींचा इशारा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नारीशक्तीच्या भरारीला रोखण्यात आले आहे, त्यांच्या स्वप्नांना चिरडले गेले आहे. जेव्हा महिला हिताचा प्रस्ताव सभागृहात पडला, तेव्हा विरोधी पक्ष आनंदाने टाळ्या वाजवत होते. २१व्या शतकातील महिला या नेत्यांचे मनसुबे ओळखून आहेत. काँग्रेस, डीएमके आणि समाजवादी पक्ष यांसारख्या पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करून जे पाप केले आहे, त्याची शिक्षा त्यांना देश नक्कीच देईल, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.१८) विरोधकांवर हल्लाबोल केला.



नारी शक्ती वंदन अधिनियम (१३१वी घटनादुरुस्ती) लोकसभेत शुक्रवारी नामंजूर झाले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी देशाला संबोधित केले. यावेळी त्यांनी या विधेयकाच्या मुद्यांवरून विरोधकांवर जोरदार टीका केली.

#### प्रयत्नांची भ्रूणहत्या

पंतप्रधानांनी महिला आरक्षणाला विरोध करण्याच्या कृतीला ‘भ्रूणहत्या’ असे संबोधले. ‘आम्ही महिलांना शक्ती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, मात्र काँग्रेस, टीएमसी आणि त्यांच्या मित्रपक्षांनी या प्रयत्नांची भ्रूणहत्या केली आहे,’ असा आरोप त्यांनी केला. आत्मकेंद्री व संकुचित विचारधारा असणारे पक्ष कधीच महिलांचे हित पाहू शकत नाहीत. त्यांना केवळ स्वतःची सत्ता टिकवायची आहे. म्हणूनच त्यांनी या विधेयकाला खीळ घातल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, नारी शक्ती वंदन अधिनियम लागू करण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला, मात्र आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही. नारी शक्ती वंदन अधिनियममध्ये संशोधन होऊ शकले नाही. त्याबाबत मी सर्व महिलांची माफी मागतो. महिलांचे स्वप्न विरोधकांनी पूर्ण होऊ दिले नाही. विरोधकांनी भारताच्या नारीशक्तीला रोखण्याचे काम कशा प्रकारे केले हे संपूर्ण भारत पाहत आहे.

परिसीमनामुळे राज्यांचे नुकसान होईल हा विरोधकांचा दावाही पंतप्रधानांनी यावेळी फेटाळून लावला. परिसीमनाबाबत जाणीवपूर्वक खोटे बोलले गेले. सरकारने पहिल्या दिवसापासून आपली भूमिका स्पष्ट केली होती, तरीही तांत्रिक पेच निर्माण करून देशाला चुकीचे सांगण्यात आले, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून कानपोलीत विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विकासकामांचा धडाका सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील कानपोली येथे शनिवारी (दि.१८) विविध विकासकामांचा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी रायगड जिल्हा परिषद, पनवेल पंचायत समिती आणि पनवेल महानगरपालिकेत भाजपची सत्ता आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात विकासकामांचा झंझावात सुरूच राहिल, अशी ग्वाही दिली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत राष्ट्रीय मार्ग ते कानपोली या मुख्य रस्त्याचे काम पूर्ण झाले असून याचे लोकार्पण तसेच येथील नदीवर साकव बांधण्याच्या महत्त्वपूर्ण कामाचे भूमिपूजन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक दिनेश खानावकर, विनोद पाटील, प्रकाश खैरे, एकनाथ पाटील, कुणाल काटे, नवनाथ पाटील, परेश पाटील, राजेश पाटील, दीपक उलवेकर, भास्कर आगलावे, डॉ. संतोष आगलावे, निखिल तांडेल, दिलीप वास्कर, शैलेश माळी, राजेश गोंधळी, बाळकृष्ण पाटील, दिनेश पाटील, निवृत्ती पाटील, रमेश मते, बाबुराव पाटील, सहदेव मते, अंकुश जोशी, गोमा पाटील, संतोष पाटील, सज्जन पवार, कैलास पाटील, आंबो पाटील, मधुकर पाटील, जीवन पाटील, गणेश पाटील, संदीप पाटील, शत्रुघ्न पाटील, प्रल्हाद साळुंखे, सचिन जोशी, मिथुन पाटील, बजरंग खानावकर, सागर पाटील, योगेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ तसेच झाशीची राणी महिला मंडळाच्या सदस्य उपस्थित होत्या. या दोन्ही कामांमुळे परिसरातील दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

## गोरेगाव कॉन्सर्ट प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद

### पोलादपूर येथे आवळल्या मुसक्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबईतील गोरेगाव येथील नेस्को ग्राउंडवर झालेल्या म्युझिक कॉन्सर्टदरम्यान दोन युवकांचा ड्रग्जच्या अतिसेवनामुळे मृत्यू झाला होता. यानंतर फरार असलेला आरोपी आयुष विकी साहित्य (वय २४, रा. उल्हासनगर) याला पोलादपूर येथे नाकाबंदीमध्ये पकडण्यात आले. तो गोवा येथे कारने चालला होता.

गोरेगाव येथील म्युझिक कॉन्सर्टच्या नावाखाली आयोजित कथित रेव्ह पार्टीमध्ये ड्रग्जचे अतिसेवन करणाऱ्या दोन तरुणांचा



मृत्यू झाला होता. या प्रकरणी मुंबईतील वनराई पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील एक फरार आरोपी आयुष साहित्य हा गोवा येथे पळून जात असल्याची माहिती मुंबई पोलिसांनी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना कळविली. त्यानुसार पोलादपूर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा संयुक्तपणे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर येथे नाकाबंदी करीत सापळा रचला. यात आयुष हा सहज अडकला.

आरोपी आयुषने एक्सटसी या नावाचा अमली पदार्थ गोरेगावच्या म्युझिक कॉन्सर्टमध्ये वितरित केल्याचे पोलीस तपासात तसेच मृतांच्या शवविच्छेदन व फोरेन्सिक अहवालात निष्पन्न झाले आहे. आयुषला (एमएच ०५ जीडी ५३९८) मारूती सुझुकी कारसह पकडून पोलादपूर पोलीस ठाण्यात आणल्यानंतर झाडाझडती घेऊन ताबडतोब मुंबईतील वनराई पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या महागाई भत्त्यात (डीए) दोन टक्क्यांची वाढ करण्यास मंत्रिमंडळाने गुरुवारी मंजुरी दिली. सरकारच्या या निर्णयामुळे लाखो केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी दोन टक्क्यांचा वाढीव महागाई भत्ता १ जानेवारी २०२६पासून लागू असणार आहे. म्हणजे एप्रिल महिन्याच्या व्यतिरिक्त जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्यांचीही थकबाकी सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. याबरोबरच दुसरीकडे आठवा वेतन आयोग लागू करण्याबाबतही हालचाली सुरू आहेत. त्यामुळे येणाऱ्या काही महिन्यांत कर्मचाऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### निवडक

#### होर्मुझची सामुद्रधुनी इराणकडून पुन्हा बंद

**तेहराण :** लेबनॉनमधील युद्धविराम करारांनंतर शुक्रवारी उघडलेली होर्मुझची सामुद्रधुनी अवघ्या २४ तासांत इराणने पुन्हा बंद केली आहे. अमेरिकेने आपल्या बंदरांवरील नाकेबंदी कायम ठेवून वचनभंग केल्याचा आरोप करत इराणने या जागतिक स्तरावर महत्त्वाच्या असलेल्या जलमार्गावर पुन्हा कडक नियंत्रण मिळवल्याचे शनिवारी (दि.१८) जाहीर केले. यामुळे गेल्या काही आठवड्यांपासून शांत असलेला हा सागरी मार्ग पुन्हा एकदा अडथळ्याचा बनला आहे.

#### नाशिक टीसीएस प्रकरणात दोन आरोपींना पोलीस कोठडी

**नाशिक :** टीसीएस महिला अत्याचार प्रकरणातील गुन्ह्यामध्ये शफी शेख, रजा मेमन यांना महिला विनयभंगाच्या दुसऱ्या गुन्ह्यात शनिवारी (दि.१८) न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, आरोपींकडून जप्त केलेल्या मोबाईलमधून रिकव्हर डाटा आधारे जिहाद आणि दहशतवादाचा मोठा कट असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## उरण नगरपालिकेत नगराध्यक्षांच्या मनमानी कारभाराने अधिकारी, कर्मचारी मानसिक तणावात

### प्रशासकीय कामात हस्तक्षेपामुळे बदलीसाठी साकडे



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि त्यांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय कामात सातत्याने हस्तक्षेप होत असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. नगराध्यक्ष व काही पदाधिकारी यांच्या दडपशाही आणि मनमानी कारभाराला कंटाळून नगरपरिषदेतील सर्व संवर्ग अधिकारी आणि राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी आपली अन्यत्र बदली करण्यात यावी, अशी मागणी वरिष्ठ प्राधिकाऱ्यांना केली आहे.

नगर परिषदेत राजकीय मतभेद टोकाला पोहचले असून त्याचा नाहक त्रास प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला जात आहे. संवर्ग कर्मचाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ कार्यालयात जाणीवपूर्वक तथ्यहीन आणि खोट्या तक्रारी करून त्यांच्यावर मानसिक दबाव आणला जात आहे.

यात एका निलंबित कर्मचाऱ्याच्या प्रभावाखाली नगराध्यक्ष व त्यांचे पदाधिकारी हे कृत्य करत असल्याची नगर परिषदेमध्ये दबक्या आवाजात चर्चा आहे. या सर्व परिस्थितीने नगरपालिकेत शिस्त उरली नसून दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगराध्यक्ष आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या या हस्तक्षेपामुळे अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची झाले आहे. याचा थेट परिणाम शहराच्या विकासकामांवर आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर होत आहे. "आम्ही मानसिक तणावाखाली आहोत, आमचे कौटुंबिक आयुष्य विस्कळीत होत आहे," अशा शब्दांत अधिकाऱ्यांनी विशेषतः महिला अधिकाऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या आहेत.

उरण नगर परिषदेतील सध्याची परिस्थिती पाहता येथे काम करणे कठीण झाले असल्याचे सांगत सर्व राज्यस्तरीय संवर्ग अधिकाऱ्यांनी आपली बदली करावी, अशी विनंती नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे केली आहे. आता यावर वरिष्ठ प्रशासन काय पाऊल उचलते आणि नगराध्यक्षांच्या या कार्यपद्धतीवर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उष्माघातामुळे शेतकऱ्याचा मृत्यू

**वाशिम : प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र वाढत्या तापमानाचा तीव्र परिणाम जाणवत असून उष्माघातामुळे वाशिम जिल्ह्यातील डोंगरकीन्ही येथे एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि.१८) समोर आली आहे. गोपाळ ठाकरे (वय २५) असे त्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गोपाळ ठाकरे हे त्यांच्या शेतात हळद घासण्याच्या कामात मदत करत होते. दुपारी १२च्या सुमारास त्यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. आसपासच्या नागरिकांनी आणि नातेवाईकांनी तातडीने त्यांना मालेगाव येथील रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतरही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी वाशिम येथील खासगी दवाखान्यात हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## आणखी एका भोंदूबाबाला बेड्या

**संगमनेर : प्रतिनिधी**

कर्करोगासारखे दुर्धर आजार केवळ एका मंत्राने बरा करणारा, अपत्य नसणाऱ्या स्त्रियांना मुले होण्याचे आमिष दाखवणारा, घरातील सर्व समस्या मंत्रशक्तीद्वारे चुटकीसरशी बऱ्या करणाऱ्या आणि हे सर्व उपचार करण्यासाठी लोकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळणाऱ्या संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील भोंदूबाबाला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. राजेंद्र बापू गडगे असे या भोंदूचे नाव आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या रंजना गवांदे यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात भोंदूबाबा राजेंद्र गडगेविरुद्ध फिर्याद नोंदवली. विज्ञानाने हात टेकलेल्या आजारांवर मंत्रांच्या साह्याने उपचार करण्याचा दावा करून त्याने अनेक रुग्णांचे आर्थिक,



शारीरिक आणि मानसिक शोषण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यानुसार गडगे याच्यासह पाच जणांविरोधात शुक्रवारी रात्री उशिरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यानंतर पोलीस पथकाने भोंदू गडगे आणि मधुकर शिंदे (रा. रहिमपूर, संगमनेर) या दोघांना वडगाव पान येथून ताब्यात घेत अटक केली.

गडगेबाबा हा गेल्या अनेक वर्षांपासून वडगाव पान परिसरात ‘दत्तधाम सरकार ’ नावाचा मठ चालवतो. या बाबाने दत्तधाम सरकार नावाचे समाज माध्यमात खाते उघडून आपल्या करामती दाखवत असे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## मुरूडमध्ये जवळ्याची आवक वाढली

### मत्स्यप्रेमींसाठी पर्वणी

**मुरूड : संजय करडे**

मुरूड तालुक्यातील राजपुरी, आगरदांडा, कोर्लई, बोर्ली सावली, एकदरा आदी भागात



ओल्या जवळ्याची आवक खूप वाढली आहे. मासेमारी करणाऱ्या प्रत्येक बोटीतून ओला जवळा मोठ्या प्रमाणात येत आहे, पण ओल्या जवळ्याचा खप कमी असल्याने तो सुकवला जात आहे.

यंदा जवळा मिळण्याचा विक्रम झाला आहे. हा ओला जवळा कडक उन्हात सुकवल्यावर किमान ३०० रुपये किलोने बाजारात विकला जात आहे. पुणे, मुंबई येथील अनेक पर्यटक सुकी मासळी घेण्यासाठी खूप उत्सुक असतात. ते सुके बोंबील, अंबाडी सुकट; त्याचबरोबर सुका जवळा मोठ्या प्रमाणावर खरेदी करीत असतात.

पावसाळी हंगामात बोटी किनाऱ्यावर असतात. अशावेळी सुकविलेली मासळी हा एकमेव आधार मांसहारी खवय्यांनो असतो. मुरूड तालुक्यातील असंख्य लोक व पर्यटक सुकवलेला जवळासुद्धा मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. मच्छीमार कुटुंबांना ओला जवळा उदरनिर्वाह करण्यासाठी मोठा आधार देणारा घटक ठरला आहे. मुबलक प्रमाणात ओला जवळा प्राप्त होत असल्याने प्रत्येक गावागावात तो सुकवून विक्री होताना दिसत आहे.

## राज्यात वादळी पावसाचा अंदाज



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिलदरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात ढगाळ हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीटीची शक्यता आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाचे क्षेत्र वाढण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग)देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. तथापि, २२ तारखेला वादळी पावसाचे क्षेत्र आणि त्याच्या तीव्रतेत घट होईल. दरम्यान, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आणि सतर्कता बाळगण्याचे आवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

## अखंड वीजपुरवठ्यासाठी होणार ‘एआय’चा वापर

**मुंबई : प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची विक्रमी मागणी पूर्ण करतानाच वीजनिर्मिती आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी आता एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेतला जाणार आहे. ऊर्जेचे नेटके व्यवस्थापन आणि तांत्रिक बिघाडांचा अंदाज घेण्यासाठी एआयचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून यामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शनिवारी (दि.१८) आयोजित उन्हाळ्यातील पीक डिमांड आणि वीज वितरण व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उन्हाळ्याचा वाढता तडाखा आणि आगामी पावसाळा या दोन्ही ऋतूंमध्ये वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता ऊर्जा विभागाने तंत्रज्ञानाची जोड द्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. विशेषतः मागणीचा अचूक अंदाज वर्तवणे, देखभाल-दुरुस्तीची कामे नियोजित करणे आणि संभाव्य तांत्रिक धोके ओळखण्यासाठी एआय यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या बैठकीला ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह टाटा पॉवर, अदानी पॉवर आणि 'बेस्ट'चे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यात सध्या रुफटॉप सौर ऊर्जेचा वापर वाढत असल्याने त्याचा मोठा फायदा वीज व्यवस्थापनात होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले तसेच वीजनिर्मितीसाठी आवश्यक असलेला कोळसा आणि पाणी यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने राज्यावर विजेचे संकट ओढवणार नाही, अशी ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली.

#### मान्सूनपूर्व कामे युद्धपातळीवर

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनपूर्व देखभाल-दुरुस्तीची कामे सध्या युद्धपातळीवर सुरू असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे, मात्र ही सर्व कामे अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी आधुनिक सॉफ्टवेअर्सचा वापर अनिवार्य आहे. पावसाळ्यात झाडे पडणे किंवा तांत्रिक बिघाडामुळे होणारा खंड टाळण्यासाठी एआयच्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग करण्यावर भर दिला जाणार आहे. ग्राहकांना अखंडित वीज मिळावी यासाठी खासगी आणि सरकारी अशा सर्व वीज कंपन्यांनी समन्वयाने काम करावे, असे आदेशही देण्यात आले.

# महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना सोडणार नाही -भाजप नेत्या चित्रा वाघ

**नाशिक : प्रतिनिधी**

महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना उद्ध्वस्त केल्याशिवाय हे सरकार स्वस्थ बसणार नाही. तपास पथक आरोपींविरोधात जास्तीत जास्त ठोस पुरावे गोळा करण्यात गुंतले आहे. जर आपल्याला काही माहिती असेल अथवा तक्रार करायची असेल तर थेट पोलिसांना माहिती द्या, असे भाजप आमदार चित्रा वाघ म्हणाल्या. त्यांनी अशोक खरात आणि नाशिक टीसीएस प्रकरणात दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी यासाठी सरकार कायद्याच्या चौकटीत राहून आवश्यक ते काम करत असल्याचे सांगितले.

सरकारी, निमसरकारी, खासगी अशा प्रत्येक आस्थापनेत शोषण होत असल्यास तक्रार करण्यासाठी आणि त्या तक्रारीची दखल घेऊन निःपक्षपाती चौकशी करून अहवाल देण्यासाठी समिती आवश्यक आहे. समितीने दोषी ठरवलेल्यांवर आस्थापनेकडून तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे. आवश्यक तिथे पुढे जाऊन कायदेशीर कारवाईसाठी पोलिसांत तक्रार नोंदवणेही आवश्यक आहे. पण टीसीएस सारख्या अनेक खासगी आस्थापनांमध्ये तक्रारींची दखल घेऊन कारवाई करण्यासाठी समिती नाही किंवा असली तर ती समिती निःपक्षपाती नाही. यामुळे महिला तक्रार करणे टाळतात. काही वेळा नोकरी जाण्याच्या भीतीने तक्रार टाळली जाते. प्रामुख्याने खासगी आस्थापनेत नोकरी टिकवण्यासाठी तक्रार टाळण्याचे प्रकार घडतात. यावर ठोस उपाय करणे आवश्यक आहे. बदलत्या कार्यालयीन संस्कृतीचा आणि तंत्रज्ञानाचा विचार करून कायद्यांमध्ये दुरुस्तीची आवश्यकता आहे. या संदर्भात लवकरच तज्ज्ञांशी चर्चा करून सरकारी पातळीवर आवश्यक तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन भाजप आमदार चित्रा वाघ यांनी दिले.

आस्थापन सरकारी, निमसरकारी, खासगी अशा कोणत्याही प्रकारचे असू दे... तिथे आलेल्या तक्रारीची एक नोंद सरकारकडे व्हायला हवी. तक्रारीवर ९० दिवसांत निर्णय दिला नाही तर समितीवरच दंडाची तरतूद हवी. महिला – पुरुष यापैकी कोणीही असतील त्यांना कार्यालयात अथवा वर्क फ्रॉम होम करताना शोषणाला सामोरे जावे लागले. थेट बोलून अथवा कृती करून किंवा डिजिटल संवादातून (WhatsApp, Email) वा आस्थापनाशी संबंधित कार्यक्रम, बैठक, सहल अशा ठिकाणी शोषणाला सामोरे जावे लागल्यास तक्रार करण्याची आणि त्यावर आवश्यक ती कारवाई करण्याची व्यवस्था हवी. यासाठी तक्रारीची दखल घेऊन निःपक्षपाती चौकशी करून अहवाल देणारी समिती प्रत्येक आस्थापनेत हवी. समितीने दोषी ठरवलेल्या व्यक्तीवर आस्थापन व्यवस्थापनाने कारवाई करणे आणि आवश्यकता भासल्यास पोलीस कारवाई करणे आवश्यक आहे. या सगळ्याकरिता कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे, एका SOP चीही गरज आहे. लवकरच या संदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांच्यापुढे हा विषय सविस्तर मांडणार असल्याचे संकेत चित्रा वाघ यांनी दिले.

महिला आरक्षण प्रश्नावरही चित्रा वाघ बोलल्या. काँग्रेस आणि शरद पवारांच्या पक्षाने महिला आरक्षणाशी संबंधित विधेयकाला संसदेत विरोध केला महिला आरक्षण विधेयक पडणे ही दुःखद घटना आहे. ही घटना घडली तो दिवस देशातील महिलांसाठी काळा दिवस होता. असे चित्रा वाघ यांनी सांगितले.

## खोपोलीत पान टपरीवर गुटखा विक्री ; एकाला अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री करणारा राजेश पान शॉप टपरी चालकाला खोपोली पोलिसांनी अटक केली आहे. राजेश पान टपरी शॉप मध्ये विनापरवाना गुटखा विक्री होत असल्याची माहिती खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांना मिळाली होती .मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास हॉटेल साईश्रवणच्या बाजूला खालची खोपोली बाजारपेठेत टपरीवर छापा टाकला. त्यावेळी ५हजार ५२६ रुपये किंमतीचा गुटखा सापडला.टपरी चालकाला अटक करण्यात आली आहे याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एन गागरे हे करीत आहेत.

## खालापुरातील गुरुकुल संस्थेत साडेपंधरा लाखांचा अपहार ; दोघांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील नामांकित स्वामीनारायण गुरुकुल संस्थेत लेखापाल असलेल्या हिरेन दलसुख भाई गोंदलिया आणि तन्मय जैतीभाई काछडीया दोघे राहणार गुजरात या दोघांनी १५ लाख ५५ हजार ६०० रुपये रकमेचा अपहर केल्याची तक्रार संस्थेतर्फे खालापूर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत संस्थेच्या बँक खात्यातून विनापरवानगी हिरेन आणि तन्मय यांनी वरील रकमेचा अपहर केला .याबाबतची माहिती संस्थेतील सुरज हातमोडे यांना मिळाल्यानंतर त्यांनी संस्थेचे मुख्य संचालक असलेल्या हैदराबाद कार्यालयाला माहिती दिली .त्यानंतर या दोघांविरुद्ध तक्रार देण्याचे संचालकांनी सांगितल्यानंतर खालापूर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघेही जण फरार असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## निजामपूर मंडळामध्ये विविध दाखल्यांचे वाटप

**माणगाव : बातमीदार**



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत निजामपूर मंडळामध्ये शनिवार दिनांक १८ एप्रिल २०२० रोजी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या मंडळा अंतर्गत ३५ गावातील जनतेने या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, डोमासाईल, वय अधिवास दाखले १३२, जन्म दाखले ८, फेरफार निर्गतीकरण २७, वारस नोंदी ३० तसेच सातबारा वाटप करण्यात आले. संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजनेअंतर्गत ४५ अर्ज दाखल करून २० लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र वाटप करण्यात आले. लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत २ महिलांना लाभ देण्यात आला. १५५ खाली १२ सातबारा दुरुस्ती करण्यात आली. ३२ ग ऑर्डर तीन, शेती नुकसानीची ई–केवायसी ६९, अग्री स्टॅक अप्रुव्हल ६७ लाभार्थी यांना लाभ देण्यात आला. आधार कार्ड अपडेट, १०० आयुष्यमान भारत कार्ड लाभ देण्यात आला. कृषी विभागाचे १ ट्रॅक्टर व २ ग्रास कटर वाटप करण्यात आले. आरोग्य तपासणी लाभार्थ्यांची करण्यात आली.

सदर शिबिराकरिता निजामपूर मंडळाचे ग्राम महसूल अधिकारी सजा कालवण मारुती चाटे निजामपूर/कोस्ते बुद्रुक आकाश पवार, सजा चाच कमलेश चौखे, सजा शिरसाट सुनील टेळे, सजा कांदळगाव बुद्रुक तन्मय देसाई, सजा करंबेळी सुकेशिनी राक्षसमारे, महसूल सेवक गणेश रसाळ, जनार्दन कदम, रोशन खरस, बाळाराम कदम, गोविंद गुळंबे तसेच निजामपूर मंडळ अधिकारी विद्या अंकुश साळवे यांनी व त्यांच्या टीमने उपविभागीय अधिकारी डॉ. संदिपान सानप, तहसीलदार माणगाव विपिन लोकरे, नायब तहसीलदार अरविंद घेमूड, सुधीर यादव, राहुल शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरित्या संपन्न केले.

या शिबिराकरिता माणगाव पंचायत समिती सभापती विलास शिंदे, पंचायत समिती सदस्य अक्षय जाधव, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, भूमी अभिलेख उपाधीक्षक गणेश सोनार यावेळी उपस्थित होते.

## मुंबई महापालिका मुख्यालय परिसरात नगरसेवकांच्या गाड्यांना आरटीओने फाडले चलन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई महापालिका मुख्यालयात सध्या उपस्थित राहणाऱ्या नगरसेवकांच्या वाहनांना सध्या आरटीओची चलनच अधिक फाडले जात आहे. मुख्यालय इमारतीच्या शेजारी वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने आसपासच्या जागेत तसेच रस्त्याच्या कडेला नगरसेवक आपली वाहने उभी करतात. या वाहनांचे फोटा वाहतूक पोलिसांनी काढून त्यांच्या नावे दंडाचे चलन फाडण्याचा प्रयत्न केला आहे. शुक्रवारी बारा ते पंधरा नगरसेवकांच्या वाहनांच्या नावे दंडाची चलन फाडली गेल्याने नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.एवढेच नाही तर सहायक आयुक्तांच्या वाहनांवरही दंडाच्या चलन फाडल्या गेल्या आहेत. त्यामुळे जनतेला वाहनतळाची सुविधा देणाऱ्या महापालिकेला आपल्याच नगरसेवकांना वाहनतळाची सुविधा देता येत नसल्याने ही अधिकच वाढली आहे.

मुंबई महापालिका मुख्यालय सभागृहात सध्या अर्थसंकल्पावर भाषण सुरु असून महापालिका सभागृहात सर्वच नगरसेवक उपस्थित राहत आहेत. परंतु, त्यांची वाहने उभी करण्यासाठी कोणत्याही प्रकारे पुरेशी जागा नाही. परंतु मागील दोन दिवसांमध्ये हे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. शुक्रवारी वाहतूक पोलिसांनी तर हद्दच केली आणि रस्त्यांसह आसपास लावलेल्या नगरसेवकांच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. या वाहनांवर नगरसेवकांचे स्टीकर लावूनही ही कारवाई झाल्यामुळे तसेच वाहने उभी करण्यास जागा नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला ही उभी केल्यानंतर ही कारवाई झाल्यामुळे ही नाराजी अधिक पसरली.

याबाबत सभागृहनेते गणेश खणकर यांनी महापालिका सभागृहात प्रचंड चिड व्यक्त केली.शुक्रवारी दिवसभरात १२ ते १५ नगरसेवकांच्या वाहनांचे फोटो वाहतूक पोलिसांनी काढून त्यांच्यावर कारवाई केल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत स्थानिक वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांना तसेच सहआयुक्त पोलिस यांच्याशी बोलण्यात आले आहे. आता सलग सभागृह भरत असल्याने सर्वच नगरसेवक येत असतात. अशा परिस्थितीत जर त्यांच्या वाहनांवर स्टीकर असूनही कारवाई होत असेल तर अत्यंत निंदनीय बाब असून महापौरांनी याबाबत सहआयुक्त पोलिस कुंभार यांच्याशी बोलून अशाप्रकारची कारवाई महापालिका मुख्यालय परिसरात नगरसेवकांच्या स्टीकर असलेल्या वाहनांवर होवू नये अशाप्रकारच्या सूचना कराव्यात.

## मुंबई ३.०साठी एमएमआरडीएचा ‘सहभागातून विकास’ मॉडेल

### देशात प्रथमच जमीन संपादनाला नवा आयाम

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई ३.० च्या उभारणीसाठी जमीन संपादन प्रक्रियेत मूलभूत बदल करत देशातील पहिल्यांदाच सहभागात्मक (Participatory) मॉडेल लागू केले आहे. या धोरणातून जमीनधारकांना केवळ भरपाई देण्याऐवजी त्यांना विकास प्रक्रियेचे प्रत्यक्ष भागीदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अटल बिहारी वाजपेयी शिवडी न्हावा शेवा अटल सेतूच्या प्रभाव क्षेत्रात विकसित होणाऱ्या नव्या शहरासाठी (NTDA) मुंबई ३.० साठी एमएमआरडीएची नियुक्ती करण्यात आली असून, रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांतील सुमारे ३२३.४४ चौ.कि.मी. क्षेत्र आणि १२४ गावे या योजनेत समाविष्ट आहेत. १६ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणारी ही जमीन संपादन योजना पारंपारिक जमीन संपादन पद्धतींपासून वेगळी असून, सहमती, पर्याय आणि पारदर्शकता या तत्त्वांवर आधारित आहे. या धोरणात जमीनधारकांना पुढील पर्याय देण्यात आले आहेत :

परस्पर संमतीवर आधारित संपादन : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कराराद्वारे भरपाई निश्चित विकास हक्क (FSI/TDR) स्वरूपात भरपाई : अतिरिक्त प्रोत्साहनाचीही तरतूद भूमी संकलन मॉडेल मूळ जमिनीच्या बदल्यात २२.५ टक्के विकसित जमीन परत, ज्यामुळे जमीनधारक दीर्घकालीन मूल्यवाढीत सहभागी १)उरण व पनवेल तालुक्यातील भूधारकांना २२.५% विकसित भूखंडांचे वाटप उरण तालुक्यात करण्यात येईल. २)पेण तालुक्यातील भूधारकांना २२.५% विकसित भूखंडांचे वाटप पेण तालुक्यात करण्यात येईल या पद्धतीमुळे जमीनधारकांना केवळ आर्थिक मोबदला न मिळता नव्या शहराच्या वाढीतून होणाऱ्या लाभात थेट वाटा मिळणार आहे. या संदर्भात डॉ. संजय मुखर्जी, आयएएस, महानगर आयुक्त, एमएमआरडीए म्हणाले, “मुंबई ३.० घडवताना आम्ही लोककेंद्रित विकासाला प्राधान्य दिले आहे. शहरनिर्मिती ही केवळ पायाभूत सुविधा उभारण्यापुरती मर्यादित नसून ती नागरिकांच्या सहभागातूनच यशस्वी होते. म्हणूनच आम्ही जमीनधारकांना विविध पर्याय दिले आहेत, जेणेकरून ते त्यांच्या गरजेनुसार निर्णय घेऊ शकतील. या प्रक्रियेचे यश नागरिकांच्या स्वेच्छेने आणि सकारात्मक सहभागावर अवलंबून असेल.” नवे शहर उभारणीचा भर अटल सेतूमुळे निर्माण झालेल्या कनेक्टिव्हिटीचा लाभ घेत एमएमआरडीए या भागात नियोजित आणि संरचित शहरी विकास साधण्याच्या तयारीत आहे. सुविधांवर आधारित वेगवान वाढ नियोजनबद्ध नव्या शहर परिसंस्थेची निर्मिती वेळेत प्रकल्प पूर्णत्व यावर भर दिला जाणार आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज तळा तालुक्यात


**तळा : प्रतिनिधी**

बोरीचामाळ गावातील श्री.देवी लक्ष्मी नारायण मंदिराच्या लोकार्पण सोहळा १९ एप्रिल २०२६ रोजी १२.वा. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे हस्ते बोरीचा माळ येथे होणार आहे.

तळा तालुक्यातील बोरीचामाळ या गावात उभारण्यात आलेले लक्ष्मी नारायण मंदिर हे स्थानिक नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र ठरणार आहे. या मंदिराच्या बांधकामासाठी आ.तुकाराम काते ,गावकऱ्यांनी तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठा सहभाग घेतला आहे. मंदिरामुळे धार्मिक उपक्रमांना चालना मिळण्याबरोबरच परिसराच्या विकासालाही गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दौऱ्यात ते विविध विकासकामांचा आढावा घेणार असून स्थानिक पदाधिकारी व नागरिकांशी संवाद साधणार असल्याचे बोलले जात आहे.या कार्यक्रमामुळे तळा तालुक्यातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक बळकट होईल.उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीमुळे विकासकामांना वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

उपमुख्यमंत्री यांच्या स्वागताची जय्यत तयारी झाली असून हेलीपॅडचेही काम झाले आहे.दरम्यान, सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला असून कार्यक्रम सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक त्या सर्व तयारी करण्यात आल्या आहेत. स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवक यांचा समन्वय साधून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.



## पोलादपूर शहरात सकल हिंदू संमेलन

**पोलादपूर : प्रतिनिधी**



शहरातील मंगलमूर्ती अपार्टमेंटच्या प्रांगणात सकल हिंदू समाज आयोजित सकल हिंदू संमेलनाप्रसंगी हिंदू ऐक्यासह विविध धर्मियांचे मूळ हिंदू धर्मातच असल्याने आता एकात्मता साध्य करण्याचे आवाहन व्यासपिठावरील वयोवृध्द वत्तेफ् ह.भ.प. हरीभाऊ कंक महाराजांनी केले.

याप्रसंगी सडवलीचे माजी सरपंच बापू जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सकल हिंदू संमेलनामध्ये शुभांगी चिमणकर यांच्यासह मिलींद कुलकर्णी तसेच पंकज बुटाला आदी मान्यवर उपस्थित होते.

'हिंदू सारा एक मंत्र हा दाही दिशांना घुमवू या, धरती–नभ–पाताळ ही भारू, प्राण पणाला लावू या' या घोषवाक्याने एकात्मतेचा संदेश देत पोलादपूर विभागात सकल हिंदू संमेलनाचे आयोजन शुक्रवारी सायंकाळी पोलादपूर येथील मंगलमूर्ती पार्क येथे करण्यात आले. यावेळी समाजातील मतभेद व मनभेद दूर करून एकजूट मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

सोशल मिडियावरून व्हायरल झालेल्या या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, भगवान गौतम बुध्द आणि भारतमातेच्या प्रतिमांचा संदर्भ हिंदू एकात्मतेच्या संमेलनासाठी करण्यात आला असल्याने या सकल हिंदू संमेलनाला तालुक्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर उतेकर यांनी केले. समारोप वंदे मातरम् गीताच्या सामूहिक गायनाने करण्यात आला.

## अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर फुंडे विद्यालयात बालविवाह रोखण्याची शपथ





**उरण : प्रतिनिधी**

बालविवाह रोखण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या विशेष मोहिमेला उरण तालुक्यातील फुंडे येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधाची शपथ देण्यात आली.

हा कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. किशोर पाटील यांनी केले. त्यांनी ‘बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६’ मधील तरतुदींची सविस्तर माहिती देत बालविवाहाचे दुष्परिणाम स्पष्ट केले. तसेच कायद्यानुसार मुलांचे विवाहाचे किमान वय २१ वर्षे आणि मुलींचे १८ वर्षे असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः मुलींच्या आरोग्यावर आणि शैक्षणिक भवितव्यावर होणाऱ्या घातक परिणामांविषयी विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

“विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर न थांबता, आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव ठेवून सुजाण नागरिक बनावे,” असे आवाहन त्यांनी यावेळी केले.या प्रसंगी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, प्रा. राजू खेडकर तसेच प्राध्यापिका श्वेता जैन ,प्राध्यापिक सुवर्णा किर्लोस्कर उपस्थित होत्या.प्रशासनाच्या या मोहिमेत शाळांनी घेतलेला पुढाकार ‘बालविवाह मुक्त समाज’ घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

## ढगाळ वातावरणामुळे आहे त्या स्थितीत आंबा विक्रीसाठी बाजारात

**खोपोली : प्रतिनिधी**




मागील दोन तीन दिवसांत वातावरणात बदल होऊन ,आकाशात काळे ढग जमू लागले आहेत .ही मान्सून पूर्व अवकाळी पावसाची चाहुल असून , हवामान खात्यानेही पुढील आठवड्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अवकाळी पाऊस आल्यास नुकसान टाळण्यासाठी आंबा बागायतदार ,आंबा उत्पादकांनी आहे त्या स्थितीत आंबा काढून बाजारात विक्रीसाठी दाखल केल्याने आंब्यांची आवक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे .मात्र बाजारात दाखल होत असलेला आंबा पिकण्यासाठी पूर्ण तयार झाला नसल्याने, हा आंबा पिकविला नंतरही आंबट व बेचव लागत असल्याने आंबा स्वाद घेण्याचा आनंदावर काहीसा विरस येत आहे.तसेच मोठ्या संख्येने आंबे तयार होण्यापूर्वी खराब होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ढगाळ वातावरणाची धास्ती घेऊन आंबा उत्पादकांकडून आहे त्या स्थितीत आंबा काढून बाजारात विक्री साठी आणला जात असल्याने, मागील दोन दिवसांत कच्या व पिकलेल्या आंब्याची आवक मोठया प्रमाणात वाढली आहे .याचा परिणाम दरांवर ही झाला आहे . मागील आठवड्यात ३००–४०० रुपये डझन मिळणारा अलिबाग हापूस कच्चा आंबा आत्ता २५० ते २७० रुपये डझन दरात विक्री होत आहे . त्यात कर्नाटक , आंध्रप्रदेश येथून ही मोठ्या प्रमाणावर आंबे बाजारात विक्रीसाठी दाखल होत आहेत. रत्नागिरी देवगड हापूस आंबा सध्या तरी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत नसला तरी अवकाळी पावसाचा अंदाज मुळे हा ही आंबामागील दोन दिवसांपासून खोपोली बाजारात उपलब्ध झाला आहे.

ग्रामीण भागातील आदिवासी कुटुंबातील सदस्य ठोक व्यापाऱ्यांकडून दररोज तीन चार पाट्या घेऊन त्या शहरातील विविध भागांत जाऊन विक्री करणार्याची संख्या ही वाढली आहे . चार डझनच्या पाटी मागे सरासरी ७० ते ८० रुपये नफा कमवून हे आदीवासी कुटुंब दररोज चार पाच पाट्या विक्री करून ३०० ते ३५० रुपये नफा कमवून आपल्या कुटुंबाचा आधार बनत आहेत दररोज सरासरी पाच सहा आंबा पाट्या विक्री होतात .त्यातून २५० ते ३०० रुपये नफा सुटतो .

# पनवेलजवळ गोदामाला लागली भीषण आग





**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील पाडेघरनजीकच्या पळस्पे–जेएनपीए राष्ट्रीय महामार्गावरील जेडब्ल्यूआर या गोदामाला दुपारी आग लागली. ही आग अतिघातक व ज्वलनशील रसायनाच्या पिंपाना लागली असल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळे परिसरात ही रसायने पेटून स्फोटाने आगीचे डोम पसरू लागले आहेत.

गोदामाच्या परिसरात आगीचे लोट निर्माण झाले असून आगीचे निश्चित कारण समजू शकलेले नाही.ही आग विझविण्यासाठी पनवेल, उरण आणि नवी मुंबईतील अग्निशमन दलाची वाहने घटनास्थळी रवाना झाली आहेत. या आगीमुळे गोदामातील लाकडी,कागदी तसेच इतर ज्वलनशील पदार्थ ही आगीच्या भक्ष्य होण्याची शक्यता आहे. आग लागल्या नंतर या गोदाम आणि परिसरात काम करणारे शेकडो कामगार सैरावैरा पळत होते.

जेएनपीए बंदराच्या आयात निर्यात होणाऱ्या मालाची साठवणूक आणि वितरण करण्यासाठी उरण व पनवेल परिसरात शेकडो गोदामांची उभारणी करण्यात आली आहे.

या गोदामात ठेवण्यात येणाऱ्या मालाची सुरक्षा करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा किंवा उपाययोजना केली जात नसल्याचे अनेक आगीच्या घटनांनंतर समोर आले आहे.

## तळोजा मध्यवर्ती कारागृहात कैद्यावर हल्ला; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा मध्यवर्ती कारागृहात दोन कैद्यांमध्ये झालेल्या वादातून एका कैद्यावर दुसऱ्या कैद्याने हल्ला केल्याची घटना घडली. यात एका कैद्याने दुसऱ्याच्या तोंडावर ठोसा लगावल्याने त्याचा दात पडला आणि तो कैदि जखमी झाला. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या कैद्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

अल्तमश युसुफ शेख आणि मुबीन कादर शेख हे एका बॅरॅकमध्ये शिक्षा भोगत आहेत. १५ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास आरोपी मुबीन याने अल्तमश यांच्याकडे दहा हजार रुपयांची मागणी केली. ही रक्कम त्याच्या बहिणीच्या नावे चिठ्ठी लिहून बाहेर पाठवण्यास आणि गुगल पे द्वारे मागवण्यास सांगितले. अल्तमशने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपी मुबीन याने त्याला शिवीगाळ केली आणि दोघांमध्ये वाद झाले. यावेळी आरोपीने अल्तमशच्या पोटावर व कानाखाली जोरात ठोसे लगावले. एक ठोसा त्याच्या तोंडावर बसल्याने उजव्या बाजूच्या जबड्यातील दात तुटून पडला. या मारहाणीत अल्तमश गंभीर जखमी झाला. आणि त्याच्या तोंडातून रक्तस्त्राव झाला.

## पनवेलमध्ये गुटखा विक्रेत्यांवर कारवाई; सात टपऱ्या सील

**पनवेल : वार्ताहर**

अन्न व औषध प्रशासन विभागाने पनवेलमधील कामोठे आणि आकुर्ली परिसरात मोठी धडक कारवाई करत प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्या सात टपऱ्यांवर छापे टाकले. सहाय्यक आयुक्त नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी प्रियंका भंडारकर आणि रोहीत लोकरे यांनी ही कारवाई केली असून यात एकूण ३५ हजार ३२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कामोठे परिसरातील नॅनो पान शॉप, अपना किराणा आणि अन्य दोन पान स्टॉल्सवर धाड टाकून १६ हजार २१९ रुपयांचा साठा मिळून आला, तर आकुर्ली गावातील तीन टपऱ्यांमधून १९ हजार १०९ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला. या सर्व सातही टपऱ्या प्रशासनाकडून सील करण्यात आल्या असून संबंधितांविरुद्ध कामोठे आणि खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे बेकायदा गुटखा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात मर्यादित अन्न सुरक्षा अधिकारी असतानाही प्रशासनाने ही मोठी मोहीम राबवली असून, नागरिकांनी अशा अवैध विक्रीबाबत तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## सोसायटीच्या व्हॉट्सअप ग्रुपमधून रिमूव्ह केले म्हणून मारहाण

**नवीन पनवेल :** सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुपमधून रिमूव केल्याचा राग मनात धरून लाथाबुयांनी मारहाण आणि दगडाने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. महादेव अनंत नेरकर हे नॅचरल होम सोसायटी, टेमघर नेरे, येथे राहत असून आरोपी अनिल मंडल व त्यांचा मुलगा सचिन मंडल यांनी सोसायटीच्या व्हाट्सअप ग्रुप मधून त्यांना रिमुव्ह केले. या गोष्टीचा राग मनात धरून महादेव नेरकर यांना लाथाबुयांनी मारहाण केली. तसेच सचिन याने त्यांच्या डोळ्यावर दगड मारून त्यांना जखमी केले

## दुचाकीला कारची धडक; एक जखमी

**पनवेल :** कारने दुचाकी धडक दिल्याने ४३ वर्षीय व्यक्ती जखमी झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.राजेश कांबळे हे पळस्पे येथे राहत असून दुचाकीवरून येत आपल्या बिल्डिंगसमोर थांबले होते. त्यावेळी मागून आलेल्या कारने त्यांना धडक दिल्याने ते जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल केले. तर कारचालक भूषण रमेश गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## बोरवेलची कॉपरची वायर चोरली

**नवीन पनवेल :** बोरवेलची कॉपरची वायर चोरल्या प्रकरणी अज्ञाता विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अशोक बाबुराव खैरे हे सूर्य नगर, विटावा, ठाणे येथे राहत असून त्यांचे फार्म हाऊस मोरबे येथे आहे. या फार्म हाऊस वर असलेल्या बोरवेलची चाळीस हजार रुपये किमतीची कॉपरची वायर अज्ञाताने चोरून नेली.

## पिस्तूलने गोळी घालण्याची धमकी

**नवीन पनवेल : रामप्रहर**

मारहाण करून पिस्तूलने गोळी घालीन आणि सगळ्यांना उडवून टाकेल अशी धमकी दिल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ एप्रिल रोजी अली (पेठ गाव) सलीम खान (भाताण) दिनेश पाटील (नांदगाव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

१४ एप्रिल रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास समसुदिन आणि पियुष सुरते हे पेठ गाव येथे अंगणवाडी शाळेजवळ गेले. यावेळी महिलेची छेड काढणाऱ्या अली याला जाब विचारला त्यांच्यात भांडण झाले. त्यानंतर अली याने मित्रांना बोलावून घेतले. सलीम खान, दिनेश पाटील यांनी समसुद्दीनला हाताने मारहाण केली आणि सलीम याने पिस्टल काढली. आणि दिनेश पाटील याने समसुदिनच्या चेहऱ्यासमोर पकडून तुला गोळी घालेन आणि सगळ्यांना उडवून टाकेल असे बोलून दोघांना मारहाण केली. त्यानंतर त्या ठिकाणी काही नागरिक जमले असता दिनेश पाटील याने नरेंद्र मुंडकर यांच्या कानाजवळ पिस्तूल धरून धमकावले आणि शिवीगाळ केली.पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे




## जीवे मारण्याची धमकी देत भोसकले

**पनवेल : वार्ताहर**

भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तीस वर्षीय तरुणाला धारदार शस्त्राने भोसकून जखमी केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तन्मय शेजवळ हे करंजाडे येथे राहत असून सोसायटीमध्ये असताना खेमचंद आणि दिनेश चौगुले यांच्यात वाद सुरू होता. दिनेश चौगुले याने त्यांच्या हेल्मेट फेकून मारले.

यावेळी तन्मय आणि त्यांची होणारी पत्नी भांडण सोडवण्यासाठी गेले. त्यावेळी दिनेश चौगुले याने त्यांच्या पत्नीला केसांना ओढून बाजूला केले आणि दिनेश याच्यासोबत असलेल्या दोन महिलांनी त्यांच्या होणाऱ्या पत्नीला हाताबुयाने मारहाण केली.

यावेळी होणाऱ्या पत्नीला वाचवण्यासाठी तन्मय गेले असता दिनेश चौगुले याने धारदार शस्त्राने तन्मय यांना भोसकले. यात तन्मय जखमी झाला.

त्याला रुग्णालयात दाखल केल असता, चौगुलेने रुग्णालयात येत आईला बघून घेण्याची धमकी दिली. पनवेल शहर पोलिसांनी चौगुलेला अटक केली आहे.पनवेल पोलिस अधिक तपास करीत आहेत

## शांतीनिकेतन पब्लिक स्कूलचा १००% निकाल

**नवीन पनवेल :** शांतीनिकेतन पब्लिक स्कूल, न्यू पनवेल येथील इयत्ता दहावी (CBSE) परीक्षेचा निकाल यंदा उल्लेखनीय लागला असून शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. जाहीर झालेल्या या निकालात एकूण २३९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्व २३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.अद्विता भगवंत कुंभार हिने ९९ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला

## भाजपच्या बबन बारगजे यांच्या प्रयत्नांना यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली प्रभाग आठ मधील सेक्टर ४ ई,५ ई व ६ ई या ठिकाणी शुक्रवारी रात्री लाईट गेली, पण त्यावेळी कर्मचाऱ्यांनी दखल घेतली नाही. रात्री दीड वाजता चार ई मधील नागरिकांनी भाजप नेते बबन बारगजे यांना फोन लावला व त्यांनी तत्काळ एमएसईबी कार्यालयाकडे धाव घेतली . एमएसईबी कार्यालयामधील कर्मचाऱ्यांना सूचना देऊन सेक्टर चार –ई , पाच– ई व सहा– ई मधील विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचे आदेश दिले

शनिवारी दुपारी नगरसेविका बायजा बारगजे यांचे पती भाजप नेते बबन बारगजे यांनी एमएसईबीचे सहाय्यक अभियंता संजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांना प्रत्यक्ष घटनास्थळी बोलावले. पाहणीदरम्यान अनेक ठिकाणच्या विद्युत केबल खराब झाल्याचे निदर्शनास आले. श्री. मुंडे यांनी तातडीने वरिष्ठांना कळवून दुरुस्तीचे काम सुरू करण्याचे आदेश दिले व प्रत्येक असोसिएशनला स्वतंत्र वीजपुरवठा देण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना केल्या.

यावेळी एमएसईबीचे कर्मचारी सागर सुतार, सुनील राऊत, जालिंदर खेडकर, रोहिदास रावते व श्रीकांत धायगुडे उपस्थित होते. सिद्धिविनायक ओनर्स असोसिएशनचे सभासद पाहणी दौऱ्यातसहभागी होते नागरिकांनी मदतीला धावून आल्याबद्दल बबन बारगजे यांचे आभार मानले.

## पावसाळापूर्वीची कामे लवकरात लवकर करावी

### नगरसेवक मनोज भुजबळांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळीपूर्वीची कामे लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ यांनी आयुक्तांना निवेदन देऊन केली आहे.

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक ॲड मनोज कृष्णाजी भुजबळ यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त यांना निवेदनाद्वारे पावसाळ्यापूर्वी करण्याची कामे आपले पत्र देऊन मागणी केली आहे;.



यामध्ये त्यांनी अय्यप्पा मंदिर ते देवद कडे जाणाऱ्या नवीन रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवावे, नवीन पनवेल प्रभाग १७ येथील उंच वाढलेल्या झाडांची पावसाळ्यापूर्वी छाटणी करावी, नवीन पनवेल येथील सेक्टर १२ ,१८ ,१९ मधील हरित पट्ट्यातील गार्डन मधील पथवे दुरुस्ती , संरक्षण भिंतीची दुरुस्ती व झाडांची छाटणी करावी तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर १२ ते १९ मध्ये असलेल्या उद्यानांमध्ये डेकोरेटिव्ह लाईटचे पोल बसविण्याची मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे.

## नवीन पनवेल येथील साक्षीपार्क येथे भीम जयंती उत्साहात साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, साक्षीपार्क १ यांच्या विद्यमाने १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती, साक्षीपार्क १, सुकापूर, नवीन पनवेल येथे आयु. यादव नाना शेळके यांच्या अध्यक्षतेखाली दोन सत्रात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

पहिल्या सत्रात सकाळी ९–०० ते १०–३० वा. दरम्यान ध्वजवंदन व पूजापाठाचा कार्यक्रम बौध्दाचार्य आयु. संदेश कांबळे यांच्या हस्ते होऊन त्यानंतर "बुध्द आणि त्यांचा धम्म" या विषयावर बौध्दाचार्य आयु. संदेश कांबळे यांचेच धम्म प्रवचन झाले. त्यानंतर आयु. मंगेश बोरकर (IAS) यांचे "भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा व त्या माध्यमातून उत्कृष्ठ नोकरीसह देशसेवेची संधी.. एक विश्लेषण" या विषयावर मार्गदर्शनपर उत्कृष्ठ व्याख्यान झाले.

दुसऱ्या सत्रात ३–०० ते १२–०० वा. दरम्यान मुलांच्या व महिलांच्या विविध स्पर्धांचे कार्यक्रम होऊन, बक्षीस वितरण व मान्यवरांचा सत्कार होऊन रात्रो ८–०० वा. देवानंद तांबे व संदिप जाधव यांच्या स्वरांगण ऑर्केस्टाचा सुरेल कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांतदादा ठाकूर तसेच भाजपा अनुसूचित मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आयु. अमित जाधव तसेच बौध्दजन पंचायत समितीचे पनवेल गट क्र.५७ चे गटप्रतिनिधी आयु. प्रमोद सावंत आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन आयु. सुबोध पवार यांनी केले.



## महिलांसाठी क्रांतिज्योत पॉवर एक्सपो २०२६

**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष रुपाली शिंदे यांचा वाढदिवस यंदा आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होणार आहे. केवळ वाढदिवसापुरता मर्यादित न ठेवता, महिलांना सशक्त बनवण्याच्या उद्देशाने एक भव्य उपक्रम राबवण्यात येत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रुपाली शिंदे या तळागाळातील महिलांसाठी सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग मिळाला आहे. महिलांना न्याय, संधी आणि आत्मविश्वास देण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे उभे केले आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त "क्रांतिज्योत Power Expo २०२६" या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा एक्सपो महिलांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार असून, स्वतः तयार केलेल्या वस्तू, कला आणि व्यवसायाचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी महिलांना मोठं व्यासपीठ मिळणार आहे.

या एक्सपोमध्ये महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, खाद्यपदार्थांचा खास स्टॉल, महिला उद्योजिकांसाठी नेटवर्किंग संधी, विविध क्षेत्रातील नामांकित महिलांचा सन्मान, नवनिर्वाचित नगरसेविकांचा गौरव अशा विविध उपक्रमांचा समावेश असणार आहे. प या दिवशी अनेक यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते रात्री ९ तसेच सन्मान व पुरस्कार सोहळा सकाळी १०:३० ते ११:३० या वेळेत कालीमाता हॉल, सेक्टर १३, न्यु पनवेल येथे होणार आहे महिलांच्या कलाकृतींना प्रोत्साहन द्यावे आणि खरेदी करून त्यांना साथ द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## पनवेलच्या बाजारात डोंगरची काळी मैना दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि डोंगररांगांमध्ये मिळणाऱ्या रानमेव्याचा अनोखा संगम सध्या पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये पाहायला मिळत आहे. डोंगराची काळी मैना म्हणून ओळखली जाणारी काळी करवंद सध्या बाजारात दाखल झाली असून कडाक्याच्या उन्हातही ही खरेदी करण्यासाठी ग्राहकांची मोठी उत्सुकता आणि गर्दी दिसून येत आहे.



चवीसोबतच औषधी गुणधर्मांमुळे करवंदांना मागणी

काळी पिकलेली करवंदे पाहताच अनेक ग्राहकांच्या बालपणीच्या आठवणी ताज्या होत आहेत. लहानपणी करवंदे हातात धरून "कोंबडा की कोंबडी" असा खेळ खेळत ही करवंदं खाण्याचा आनंद आजही अनेकांच्या मनात घर करून आहे. आज याच आठवणींना उजाळा देत अनेक पनवेलकर खास करून ही काळी करवंद शोधण्यासाठी बाजारात येत आहेत. केवळ चवीसाठीच नव्हे, तर आरोग्याच्या दृष्टीनेही ही काळी करवंदे अत्यंत उपयुक्त मानली जातात. करवंदांमध्ये अनेक नैसर्गिक औषधी गुणधर्म आढळतात. करवंदामध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. कच्च्या हिरव्या करवंदाची भाजी किंवा पिकलेली करवंदं खाल्ल्याने पोटाचे विकार दूर होतात आणि भूक वाढण्यास मदत होते. रक्ताल्पता (अनिमीया) असलेल्या रुग्णांसाठी करवंदं गुणकारी मानली जातात, कारण यात लोहाचे प्रमाण भरपूर असते.रक्ताभिसरण सुरळीत ठेवण्यासाठी आणि उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी देखील करवंदे फायदेशीर ठरतात. एकूणच रानातून येणाऱ्या उन्हाळी फळे व भाज्यांची उपलब्धता यंदा काही प्रमाणात कमी असल्याने, स्वाभावीकच मागणी वाढती आहे. त्यामुळे यंदा या करवंदाचे दर गगनाला भिडले आहेत. पनवेल भाजी मार्केटमध्ये सध्या सुमारे २०० रुपये पाव किलो या दराने ही करवंदे विकली जात आहे. आदिवासी बांधवांकडून येणारी करवंदे वाट्यावर विकली जात आहेत.

ही करवंदे अत्यंत अल्प काळासाठी बाजारात उपलब्ध असल्याने ग्राहक चढ्या दरानेही ती खरेदी करण्यास पसंती देत आहेत. रानमेव्याचा मनसोक्त आनंद घेण्याची संधी मात्र चालून आली आहे.

## ओएनजीसीच्या इमारतीसमोर डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**उरण : बातमीदार**

ओएनजीसी उरण आणि ऑल इंडिया एससी एसटी असोसिएशन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने ओएनजीसीच्या प्रशासकीय इमारतीच्या समोर असलेल्या प्रांगणातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या अनावरण करण्यात आले महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सदर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

सुमारे ३५ वर्षानंतर आज जुन्या पुतळ्याचं विस्थापन करून निर्माण झालेल्या जागेत पूर्वीपेक्षा सुंदर आणि पंचधातूनी युक्त अशा



नवीन पुतळ्याला पुनर्स्थापित करण्यात आले.ओएनजीसी उरणचे प्लांट मॅनेजर अहमद सर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून ह्या पवित्र पुतळ्याचं अनावरण करण्यात आले.दादर येथील चैत्यभूमी मधून आलेल्या भंतेजी यांच्या माध्यमातून प्रथम पंचशील म्हणून आणि नंतर भीम स्तुती गाऊन या पुतळ्याच्या अनावरणाला सुरुवात झाली. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आणि त्यांचे पंचशील याबाबत विस्तृत विवेचन भंतेजी यांच्या माध्यमातून सर्वांसमोर करण्यात आलं.

प्रत्येक साधकाला, भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी रचलेल्या स्वतंत्र भारताच्या संविधानाची प्रत भेट म्हणून देऊन भूषविण्यात आलं. त्याच सोबत भीमगाथा या वाद्य वृंदाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून भीम स्तुती आणि आणि सुश्राव्य गाण्याच्या माध्यमातून,सादर करून उपस्थित श्रोत्यांचे मनोरंजन करण्यात आलं.

# अष्टपैलू गायिका आशा भोसले

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आशा भोसले... सुरुवात कुठून करावी असा या व्यक्तिमत्वाची खोलवर ओळख करून देताना मला प्रश्न पडतोय आणि सांगावे असे अक्षरशः बरेच काही आहे, तर मग ते सांगूनही बरेच काही सांगायचे राहून जाईल की काय असा प्रश्न पडावा असं हे चौफेर, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे.

सगळ्यात पहिला महत्त्वाचा प्रश्न, आशाताईंना मृत्यूची चाहूल लागली होती अशी शंका त्यांच्या इन्स्टावरच्या शेवटच्या पोस्टवरून येते. १८ मार्च रोजी त्यांनी केलेली ही पोस्ट आहे, आशा भोसले यांच्या निधनानंतर (१२ एप्रिल २०२६) या पोस्टची सोशल मीडियात बरीच चर्चा झाली. त्या पोस्टमध्ये त्यांनी ' इंटरनॅशनल गोरिल्लाज' या बँडसोबतचा एक फोटो पोस्ट केला आहे. या फोटोच्या बॅकग्राऊंडमध्ये भारतीय वस्ती, हत्ती आणि काही मोडकळीस आलेल्या वस्तू दिसत आहेत. फोटोमध्ये आशाताई अत्यंत शांत आणि साध्या अवतारात दिसत आहेत. या पोस्टमध्ये त्या म्हणतात, या बँडचं shadowi light हे गाणं माझ्यासाठी गहन अर्थ घेऊन आलेलं आहे.

त्यात त्या पुढे लिहितात, वाराणसीला जाऊन पवित्र गंगा नदीतून प्रवास करताना मी जे काही जवळून पाहिलं त्यातून मला आयुष्याचा अर्थ समजला. मी कोण आहे आणि पृथ्वीवर मला काय करायचं आहे हे कळलं. 'द शॅडोवी लाईट'मध्ये या खोल नदीचं पार करणं म्हणजे माझ्या आयुष्याचा प्रवास आहे.

माझा जन्म, माझी नाती, माझं संगीतावरील समर्पण, माझी यशस्वी वाटचाल आणि मुलगी, आई, बहीण, पत्नी आणि एक हिंदू भारतीय म्हणून माझी कर्तव्यं. या प्रवासात बोट चालवणारा नावाडी म्हणजे माझं संगीत आहे. जे मला आयुष्याच्या या नदीतून जाताना मार्गदर्शन करतं.

पोस्टमध्ये पुढे लिहिलंय, जेव्हा मी या नदीच्या दुसऱ्या काठावर पोहचेन तेव्हा माझा प्रवास पूर्ण होईल. मला मोक्ष प्राप्त होईल. अंतिम मुक्ती. त्या अवस्थेत मी आपल्या आजूबाजूला तरंगणाऱ्या हजारो आवाजांपैकी एक होईन. त्या आवाजांपैकी काही एकत्र आले तर एक सुंदर धून तयार होते. त्यामुळे मीही त्या ध्वनिंपैकी एक होईन जो पुढे जाऊन एका सुंदर गाण्याचा सूर बनेल... असं गाणं जे हजारो वर्षं अनेक पिढ्या ऐकतील. निसर्गाशी एकरूप होण्याची हीच खरी मुक्ती मला त्या दुसऱ्या काठावर मिळणार आहे!

आशा भोसले यांच्या या पोस्टमधून काही सूचक अर्थ काढण्यात आले. त्यांच्याबद्दल सांगाव तेवढं थोडेच. असाच एक बहुचर्चित विशेष किस्सा... संगीतकार सुधीर फडके आणि पार्श्वगायिका आशा भोसले ही एक अतिशय जमलेली जोडी आणि याच जोडीचे एक अतिशय लोकप्रिय गाणे दत्तात्रय चित्र या बॅनरखालील राजदत्त दिग्दर्शित "या सुखांनो या" या चित्रपटात होते. या गाण्याचे बोल होते,

*या सुखांनो या, एकटी पथ चालले*
*दोघांस आता हात घ्या, साथ द्या*

हे गाणे ग.दि. माडगूळकर यांनी लिहिले होते. या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळचा किस्सा... या चित्रपटाची निर्मिती रमेश देव व सीमाताई यांची होती आणि या गाण्यामुळेच 'गदिमा' आणि सुधीर फडके यांच्यातील उगाच निर्माण झालेला वाद मिटला होता. आता ते पुन्हा एकत्र आले म्हणून आशा भोसलेदेखील आनंदल्या.

रेकॉर्डिंगच्या वेळेस सुधीर फडके अर्थात बाबुजी माडगूळकर यांना म्हणाले, अण्णा आपण उगीचच इतके दिवस भांडत होतो. रमेशचे आभार मानले पाहिजेत. त्याच्यामुळेच आपण पुन्हा एकत्र आलो, पण दुर्दैव असे की ग.दि. माडगूळकर व सुधीर फडके यांचा हा शेवटचा चित्रपट ठरला, कारण यानंतर ग.दि. माडगूळकर यांची तब्येत बिघडत बिघडत गेली आणि त्यात त्यांना काम करणे अवघड होऊन गेले. त्यानंतर त्यांचे निधन झाले. १९४८ सालच्या "वंदे मातरम" या चित्रपटाच्या वेळेस ग.दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांचे सूर जुळले आणि १९७४च्या "या सुखांनो" या चित्रपटांपर्यंत ते कायम होते.

"या सुखांनो या" हे गाणे रेकॉर्ड झाले आणि प्रथेनुसार मानधन देणे आले. निर्माते म्हणून रमेश देव यांनी आशा भोसले यांना पाच हजार रुपयांचे पाकिट दिले. ते हाती येताच आशा भोसले यांनी सीमाताईना जवळ बोलावले व म्हणाल्या, तुझा हा पहिला पिक्चर. हे तुला माझ्याकडून गुडलक. असे म्हणतच ते पाकिट सीमाताई यांच्या हातात दिले आणि म्हणाल्या, याची साडी घ्यायची नाही. रमेशलाही द्यायचे नाहीत. तो हे पैसे प्रॉडक्सन्समध्ये खर्च करेल. तू याचा दागिना कर...

दोनच वर्षांपूर्वीची गोष्ट. वांद्र्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आशा भोसले यांचा आम्हा सिनेपत्रकारांशी संवाद. निमित्त आशा भोसले यांच्या दुबईतील कार्यक्रमाची माहिती देणे. आशाजींसोबत सुदेश भोसले वगैरेही हजर. आशाजींचा उत्साह तरुणांना लाजवणारा. आपण कोणती गाणी गाणार आहोत याबाबत त्या अतिशय मनमोकळेपणाने सांगताहेत. अशातच पूनम धिल्लॉन आपल्या मुलीसोबत येते आणि आशाजी 'यह वादा रहा' या चित्रपटातील 'यह वादा रहा' हे गाणे गुणगुणतात. एक लक्षात रहावा असाच हा लाईव्ह अनुभव. याच वेळेस भेटलेले सुदेश भोसले सांगत होते, आपण अनेक वर्ष गातोय, तर आपल्याला रिहर्सलची गरज नाही असे अजिबात न करता आशाजी आजही पूर्ण रिहर्सल करूनच गायनाच्या कार्यक्रमास सज्ज होतात. त्यांचा उत्साह अतिशय दांडगा असतो, त्यांच्याकडून शिकण्यासारखे बरेच काही आहे. तर वर्षभरापूर्वीच विलेपार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या 'स्वरस्वामिनी आशा' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यातील आशा भोसले यांचे दिलखुलास भाषण असाच एक सुखद अनुभव. आशाजींची प्रचंड ऊर्जा व सकारात्मक दृष्टिकोन कौतुक करावा तेवढा थोडाच. त्यांच्या गायकीसोबतच अन्य अनेक गोष्टी, त्यांचे गुण शिकण्यासारखे आहेत. कलाकार असावा तर असा. कामात चोख, वागण्यात आनंदी. स्वच्छंदी.

अशीच एक साधारण सोळा वर्षांपूर्वीची गोष्ट. मुंबईतील एका ट्रॅव्हल कंपनीने आपल्या व्यवसाय वृध्दीचा भाग म्हणून कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आशा भोसले यांचे संध्याकाळपासून रात्रीपर्यंत गायन अशा भव्य दिमाखदार कार्यक्रमाचे आयोजन करताच काही दिवसांतच सगळी तिकीटे हाऊसफुल्ल झालीदेखील यात आश्चर्य वाचण्याजोगे काही नव्हतेच. आता कदाचित तुम्हाला वाटेल, इतक्या वर्षांनंतर आशा भोसले यांना अनेक गाणी तोंडपाठ असतील आणि शोच्या वेळी त्या सहज गातील. त्यांनी तसे केले असते तर त्यात काहीच आश्चर्य नव्हतेच, पण आशा भोसले काही वेगळ्याच. त्यांनी सर्वप्रथम कोजागिरी पौर्णिमेनिमित्त कोणती मराठी व हिंदी गाणी योग्य ठरतील त्याची तयारी केली. मग वादक आणि अन्य गायकांसोबत रिहर्सल सुरू केली आणि मुंबईजवळच पनवेल येथे असलेल्या या शोच्या स्पॉटची माहिती मिळवली. काही कारणास्तव ती जागा निश्चित करता आली नाही. म्हणून कर्जत येथील विस्तीर्ण अशा एन.डी. स्टुडिओच्या भव्य प्रांगणात, अतिशय मोकळ्या आणि हवेशीर वातावरणात हा शो करायचे ठरले. देश–विदेशातील कधी बंदिस्त, तर कुठे ओपन थिएटरमध्ये आशाजींनी गायनाचे अनेक कार्यक्रम रंगवले, रसिकांना विलक्षण तृप्त केलेले आणि त्यात स्वतःदेखील गायनाचा मनापासून आनंद घेतला.







मला आठवतंय, आम्ही काही पत्रकार मित्रांनी एका गाडीतून वेळेपूर्वीच जाणे पसंत केले. अहो, आशाताई भोसले यांना तीन साडेतीन तास प्रत्यक्षात गाताना ऐकायचे होते ना? बरं त्या 'एक गाणे झाले की दुसरं असे यांत्रिकपणे गात नाहीत' याची कल्पना होती. ते त्या गाण्याचे व्यक्तिमत्व आपल्या शैलीत साकारतात आणि आपण ज्या नायिकेसाठी पार्श्वगायन केले ती डोळ्यासमोर उभे करणार ही त्यांची खासियत. आशाजींच्या अगदी साडीच्या निवडीपासून त्यांचा टच लक्षात येतो. गाता गाता सहज संवाद साधणे, एकादे मार्मिक मिस्कील वाक्य बोलणं, छान बोलणं हसणं, अर्थपूर्ण पाहणे, सूचक नजर टाकणे असं करत करत कार्यक्रम लाईव्ह ठेवतात तर लवकर जाऊन तशी सगळाच स्टेज दिसेल अशी जागा पटकावणे आवश्यक होतेच. हा कधीच न संपणारा अनुभव घ्यायचा होता. पत्रकारितेने मला असे बरेच चांगले अनुभव दिले. ते तुम्हा रसिकांना सांगण्यात एक आनंद असतो. तुमचा प्रतिनिधी म्हणून मी त्यात वावरत असतो.



एन.डी. स्टुडिओचा छान परिसर, मोकळे आकाश, आणि आशा भोसले एकेका गाण्यासह जुन्या आठवणीत, फ्लॅशबॅकमध्ये नेताहेत असा झक्कास अनुभव. गाण्याच पडद्यावरचे सादरीकरण डोळ्यासमोर येत आहे असा अनुभव. त्या गात असतानाच त्यांनी पार्श्वगायन केलेल्या किमान तीन चार पिढीतील अनेक नायिका, सहनायिका, खलनायिका डोळ्यासमोर येत आहेत असं वाटलं. आशाजींनी मराठीसह चौदा भाषांत गायन केले आहे. गाण्यांची संख्या बारा हजारपेक्षा जास्त आणि त्या प्रत्येक भाषेचा अर्थ, भावार्थ त्यांनी आपल्या गाण्यात परफेक्ट पकडलाय. गाण्याचा आत्मा, स्वभाव , वैशिष्ट्य त्यांनी कायमच महत्त्वाचे मानले. गाण्याचे व्यक्तिमत्व आपल्या गाण्यात उतरवले. पार्श्वगायन कसे असते, असावे, कसे शिकावे, कसे आत्मसात करावे हे आशाजींकडून आवर्जून शिकण्यासारखे.

आशा भोसले यांनी चित्रपट गायनाची सुरुवात "माझा बाळ" या चित्रपटातील 'चला चला नव बाळा' या गाण्यापासून केली. संगीत दत्ता डावजेकर यांचे आहे. १९५०च्या सुमारास त्यांनी हिंदी चित्रपटांतही अनेक गाणी गायली खरी, पण ते चित्रपट विशेष गाजले नाहीत. त्या काळात हिंदी चित्रपटसंगीतावर सुरय्या, नूरजहा, लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिका राज्य करत होत्या. त्यांना उत्तम मागणी. लता मंगेशकर तर भगिनी.

आशा यांनी मराठीत गायलेल्या गाण्यात संगीतकार सुधीर फडके यांच्याकडे गायलेली गाणी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. किती नको असं होऊन जाते, सांग तू माझा होशील का? (लाखाची गोष्ट), नाच नाचुनी अती मी दमले, तुला पाहते रे तुला पाहते (जगाच्या पाठीवर), काल मी रघुनंदन पाहिले (सुवासिनी), ही रात चांदण्याची (गरीबाघरची लेक), जो जो गाई कर अंगाई (हा माझा मार्ग एकला), लिंब लोण उतरु कशी (एकटी). आशा भोसले यांनी एका सुधीर फडके यांच्याबद्दल मुलाखतीत म्हटलं, फडकेसाहेबांनी एकदा मला सुनावलं, की सूर सुटला तरी चालेल, पण शब्द चुकता कामा नये. आता दुःख हा शब्द बघा. गाताना 'दु'वर जोर देऊनच शब्द बाहेर आला पाहिजे. गाताना चित्र म्हटलं तर काय होतं? पण नाही तो अगदी जोर लावूनच 'चित्र' असा आलाच पाहिजे असा त्यांचा आग्रह. पण यामुळे आशा भोसले यांना मराठी गाण्यात सूर सापडला असे म्हटले जाते. चित्रपट संगीत संस्कृतीचा इतिहास असा खोलवर व अनेक लहान लहान गोष्टींसह आहे.

आशा भोसले यांच्या क्षमतेबद्दल 'खरोखरच शब्द अपुरे पडतात'. कोरोनाच्या काळात त्या लोणावळ्याला होत्या, पण आराम करताहेत, छान हवेत रमल्यात, जुन्या आठवणीत रमल्यात असे मुळीच नव्हतेच. 'वय हा त्यांच्यासाठी फक्त आणि फक्त एक आकडा आहे'. तेव्हाच त्यांनी स्वतः यू ट्यूब चॅनल सुरू केले, त्यात काही जुन्या आठवणी व्यक्त केले, पण नवीन आवाजाला त्यांनी आवाहन केले आणि जगभरातून त्यांना अतिशय उत्तम प्रतिसाद मिळालादेखील. नवीन आवाज त्यांनी ऐकला हा त्यांच्यातील खूप वेगळा गुण आहे. विशेष म्हणजे आजही त्यांना कामाचा कंटाळा नाही. एका मराठी वृत्तवाहिनीच्या कट्ट्यावर त्या आल्या तेव्हा काही तांत्रिक अडचणीमुळे त्यांना दोन तास वाट पहावी लागली, पण त्या अजिबात कंटाळल्या नाहीत. अगदी दिवसभर थांबायची आपली तयारी होती, आपल्याला काम करायचेच आहे तर थांबायला काय हरकत आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. म्हणून त्या सतत आजच्या पिढीला आपल्या वाटल्या. मै जमाने के साथ चलती हू हे त्यांचे आवडते वाक्य.

आशा भोसले यांनी मराठी आणि हिंदी चित्रपट गीते झालीच, अन्य भाषेतील चित्रपटांसाठी पाश्वगायन एकीकडे तर दुसरीकडे भावगीते आणि अनेक प्रकारची गैरफिल्मी गाणी, पण त्यानी मोजून मापून काम केले आहे अथवा नवीन विक्रम प्रस्थापित करण्यासाठी त्या गायल्या/गातात असे अजिबात नाही. ती त्यांची वृत्ती नव्हती .आपल्या कामाचा भरभरून आनंद घेत इतरांनाही तो द्यावा अशा मोकळ्या ढाकळ्या स्वभावाच्या त्या होत्या. अतिशय गप्पिष्ट असा त्यांचा स्वभाव. एकदा त्यांचा दौरा सुरू होण्यापूर्वी पेडर रोडवरील प्रभू कुंज या त्यांच्या निवासस्थानी त्यांच्या भेटीचा योग आला असता. त्यानी सांगितलेल्या गोष्टींतील काही आवर्जून सांगतो,

फार पूर्वी एकेका चित्रपटाचे एकेका गाण्याचे रेकॉर्डिंग म्हणजे खूप मोठा आणि प्रत्येक वेळी वेगळा अनुभव असे. एकेका गाण्यासाठी सिटींग होत, गाण्याची चित्रपटातील जागा, त्या गाण्याचे स्वरुप, कोणावर ते चित्रीत होणार आहे अशा अनेक लहान मोठ्या तपशीलाचा विचार केला जाई, अनेक तास सिटींग चाले, त्यातच अनेक चाली सुचत, विविध कारणास्तव त्या नाकारल्या जात आणि मग एक निश्चित केली जाई. प्रत्यक्ष रेकॉर्डिंगच्या वेळी त्या चित्रपटातील कलाकार आवर्जून हजर रहात.

आशाच्या आवाजात विविधता आहे. विविध ढंगांच्या गीतांना त्या योग्य न्याय देत. गायिका जरी एक असली, तिचा गळा जरी तोच असला, तरी नानाविध स्वरांची किमया आशा भोसले सहज करून दाखवत.

प्रसिद्ध कलाकार, गायक दीनानाथ मंगेशकरांची ही तृतीय कन्या. लता मंगेशकरची धाकटी भगिनी. आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना घरातच संगीताचा सहवास लाभला. दीनानाथांचा रियाज चाले. वडिलांचा नाट्य संगीताचा वारसा त्यांनी पुढे चालवला. आशा भोसले लहानपणी सतत लता मंगेशकर यांच्याकडे असत. चार मुली, एक मुलगा, पत्नी असा सुरळीत संसार असतानाच २४ एप्रिल १९४२ रोजी दीनानाथा मंगेशकर यांचे अकस्मात निधन झाले अन् संसाराची सर्व जबाबदारी १३ वर्षांच्या लता मंगेशकर यांच्याकडे आली. मग हालअपेष्टा सुरु झाल्या. लता मंगेशकर मास्टर विनायकांकडे तसेच चित्रपटात छोटी मोठी कामे करून कुटुंबाचा खर्च भागवत होत्या. छोट्या आशाने डॉक्टर व्हावे ही तिची इच्छा होती.

त्यावेळी मंगेशकर कुटुंबीय मुंबईत वास्तव्यासाठी आले होते. लता मंगेशकर मुंबईतील फेमस स्टुडिओ, फेमस रेकार्डिग स्टुडिओ, फिल्म सेंटर इत्यादी ठिकाणी

वाऱ्या करून भावंडांचे पालनपोषण करत होत्या. त्यावेळी सर्व जण ताडदेवला राहात असत. एके दिवशी त्यांचे शेजारी भोसले नावाचा रेशनिंग इन्स्पेक्टर राहायला आले, आशा त्याच्या अधिक जवळ आल्या आणि प्रेम विवाह करून आशा 'भोसले' झाल्या. हे सगळे अचानक झाले. अनपेक्षित होते. १४ वर्षांची आशा एकदम प्रौढा झाली. माहेरशी संबंध तुटला, कारण त्यानी घरच्या मंडळींच्या मर्जीविरुध्द, इच्छेविरुद्ध विवाह केला होता. पतीच्या आग्रहामुळे त्यांना काही काळ चित्रपटसृष्टीत पडावे लागले. त्यांना तसे या क्षेत्राचे फार आकर्षण नव्हते. बालपणी मास्टर विनायक निर्मित, दिग्दर्शित आणि अभिनित प्रफुल्ल चित्र या संस्थेच्या 'माझं बाळ' (१९४३) या चित्रपटात त्यांनी लता मंगेशकराबरोबर छोटीशी भूमिका केली होती. सुरुवातीला नाखुषी पत्करलेल्या पेशात त्यांना मग गोडी वाटू लागली, पण तशी संधीदेखील मिळायला हवी. त्यासाठी त्यांना खस्ता खाव्या लागत.

आशा भोसले यांनी पार्श्वगायिका होण्याचा संकल्प केला होता. त्यामुळे त्या संगीत साधनेत रमून गेल्या. अगदी अखेरपर्यंत त्या रियाज करीत. मग वेळ कोणतीही असू देत. त्याचा त्यांना कंटाळा येत नसे. १९४८ साली संगीतकार हंसराज बहल यांनी 'चुनरिया" या चित्रपटात त्यांच्या आवाजाचा उपयोग, केला. गाणे होते सावन आया रे. सुरुवातीच्या काळात त्यांना मराठी व हिंदी चित्रपटात गाण्याची फारशी संधी मिळाली नाही. हे काहीसं निराशाजनक होते. पण आशा भोसले यांनी संयम ठेवला.

१९४७ ते ५४मध्ये आशा भोसले यांनी संघर्ष केला. पहिला मुलगा दोन महिन्यांचा असताना आपल्या मुलाला घरी ठेवून ध्वनिमुद्रणासाठी जावं लागतं असे. आई म्हणून हे अस्वस्थ करणारे असे. १९५१मध्ये 'आसमान' या चित्रपटाद्वारे ओ.पी. नय्यर या वेगळ्या शैलीतील संगीतकाराचा उदय' झाला. ओ.पी. नय्यर यांना 'रात की रानी' या चित्रपटातील जल जल गिरे है परवाने हे आशा भोसले यांचे गीत फारच आवडले बेहद्द होते. त्यांनी छम छमा छम या चित्रपटासाठी आशा भोसले यांच्या आवाजातील गाणे ध्वनिमुद्रित केले. त्यानंतर बी.आर. चोप्रा निर्मित आणि दिग्दर्शित ' नया दौर'(१९५७)मधील साथी हात बढाना, माँगके साथ तुम्हारा, ऊडे जब जब जुल्फे ही या जोडीची गाणी लोकप्रिय झाली आणि ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. पडद्यावर ही गाणी दिलीपकुमार आणि वैजयंतीमाला यांनी खुलवली हेदेखील महत्त्वाचे असते.

'नया दौर'नंतर तुमसा नही देखा, कैदी, हावडा ब्रिज, फागुन, रागिणी, सोनेकी चिडीयों, दो उस्ताद, बसंत, कल्पना, काश्मीर की कली, एक दुधौफीर एक हसीना, मेरे सनम ते अगदी १९७४च्या प्राण जाए पर वचन न जाए पर्यंत अनेक चित्रपटासाठी संगीतकार ओ.पी. नय्यर आणि आशा भोसले ही जोडी जमली आणि हिंदी चित्रपट संगीतात वेगळे पर्व रुजले.

ओ.पी. नय्यर यांच्या अगोदर अरुण कुमार, अल्लारखॉ, विनोद, गुलाम महंमद, सज्जाद हुसेन यांनी आशा भोसले यांना संधी दिली होती. ओ.पी. नय्यर आणि आशा भोसले यांच्या जोडीची काही गाणी अशी... कुछ तो ऐसी बात (कैदी), पिया पिया ना लागे (फागुन), आइये मेहरबाँ (हावडा बीज), छोटासा बालमा (रागिनी), जादुगार साँवरया (अकेकी मलमल), रेशमी सलवार कुडता (नया दौर), ये है रेशमी (मेरे सनम). त्यातच संगीतकार सी. रामचंद्र यांनी बारिशसाठी आशा भोसले यांच्याकडून मिस्टर जॉन बाबाखान हे गीत गाऊन घेतले. पाश्चिमात्य संगीतातील गायिकीला आवश्यक असणारा सूर आशा भोसले यांनी अचूक पकडला. हे गाणे लोकप्रिय झाले आणि पाश्चिमात्य सुरावटीसाठी आशा भोसले यांच्या आवाजाचा वापर सुरु झाला. ते त्यांचे खास वैशिष्ट्य ठरले, इना मिना डिका (आशा), दम मारो दम (हरे राम हरे कृष्ण), हंगामा हो गया (अनहोनी), जवानी जाने मन (नमक हलाल), डिस्को स्टेशन (हाथकडी), पिया तो अबतो आजा (कारवाँ), जाने ना (सनम तेरी कसम) अशा कितीतरी गाण्यात आशा भोसले यांचा पाश्चात्य ढग दिसतो.

आशा भोसले यांनी आपल्या पार्श्वगायनात केवढी तरी विविधता दाखवून आपले वेगळेपण अधोरेखित केले. काली घटा छाये मोरा (सुजाता), जबासे ये कहे दो (बैंक मॅनेजर), दिल की कहानी रंग लायी है (लौथवी का चाँद), दिल शामसे डुबा जाता है (संस्कार), दिल लगाकर हम ये समझे (जिंदगी और मौत), नजर लागी राजा (काला पानी), रेशमी सलवार कुडता (नया दौर), पान खाये सैया (तिसरी कसम), नत्रे मुत्रे बच्चे तेरी मुठ्ठीमे क्या है (बूट पॉलिश), गोरे गरि हातोमे (परिणीता), चाँद जहाँ (शारदा), सपनों की डोर बंधी पलकों का पलना (घरसंसार), ऐ गमे दिल क्या करु (ठोकर), तोरा मन बहा पापी (गंगा जमना), सी ए टी कैंट (दिल्ली का ठग), इतनी बडी महफिल और तू (दिल अपना और प्रित पराई), निगाहे मिलाने को जी (दिल ही तो है) ,जब छाये मेरा जादू (लुटमार), दिल चीज क्या है मेरी जान लिजिए, इन आँखो की मस्ती के (उमराव जान), मेरा कुछ सामान (इजाजत), तनहा तनहा यहाँ पे जिना (रंगीला), जरासा झुम लू मै (दिलवाले दुल्हनियाँ ले जायेगे)वगैरे वगैरे अनेक गाणी.

आशा भोसले यांनी विविध गायकांबरोबर उत्तम साथ केली आहे. प्यार पर बस तो नहीं (तलत बरोबर सोनेकी चिडीयाँ), वो सुब हा कभी तो आयेगी (मुकेश बरोबर फिर सुबह होगी), हाल कैसा है जनाब का (किशोर बरोबर चलतिका नाम गाडी) आँखोको जरा लहरादे आँखोमें आँखे मत्रा हे बरोबर कभी अंधेरा कभी उजाला), मोहम्मद रफीबरोबरची त्यांची अनेक गाणी लोकप्रिय झाली आणि आजही ती गाणी लोकप्रिय आहेत. रात सर्व सर्द है (जाली नोट), बेहीपितीयार होके (जॉनी वॉकर), जब लिया हातमे हात (वचन), झुमती है नजर (हातीमतभाई), दीवाना मस्ताना हुआ (बंबई का बाबू), मै सोया अखियाँ मिटे (फागुन), रात भरका है (सोनेकी विडीयाँ), सरपर टोपी (तुमसा नही देखा), देखकर तेरी नजर (हावडा ब्रिज), ओ मेरे सोनारे सोना ,ओ हसिना जुल्फ़ोवाली (तिसरी मंझिल)....ही गाणी अशी आणखी आहेत,

आज कुणीतरी यावे, अच्छा जी मैं हारी चलो मान जाओ नां, जीवलगा कधी रे येशील तू , तोरा मन दर्पन कहलाये, खाली हात श्याम आई है,दिल अभी भरा नहीं...

आशा भोसले यांच्याबद्दल सांगाव तेवढं थोडेच. आणखी एक वेगळी गोष्ट, सतिश रणदिवे यांनी दिग्दर्शन केलेल्या लोकराजा राजर्षि शाहू मालिकेसाठी आशा भोसले यांनी एक गाणे गायले होते. पठ्ठे बापूराव व पवळा यांची ती लावणी होती. ती शाहूमहाराजासमोर पेश झाली या ऐतिहासिक प्रसंगाचे ते गाणे होते. विशेष म्हणजे या गाण्याचे आशाताईनी काहीच मानधन स्वीकारले नाही. केवळ शाहूकार्याच्या प्रेमापोटी... आशा भोसले अशी गाणी, अशा अनेक गोष्टी यातून आपल्यासोबत कायम असतीलच...

---

## क्रांतिकारक अनंत कान्हेरे

अनंत लक्ष्मण कान्हेरे हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होते. ते गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संघटनेचे सदस्य होते. नाशिकचा कलेक्टर ए.एम.टी. जॅक्सन याची हत्या करणारे अनंत कान्हेरे हे खुदीराम बोस यांच्यानंतरचे सर्वांत तरुण वयाचे भारतीय क्रांतिकारक ठरले. अनंत कान्हेरे यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

अनंत कान्हेरे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील आयनी मेटे या गावात ७ जानेवारी १८९२ रोजी झाला. त्यांना दोन बहिणी आणि दोन भाऊ होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण इंदूर येथे तर माध्यमिक शिक्षण औरंगाबाद येथे झाले. १त्यांच्या मोठ्या भावाचे नाव गणपतराव आणि धाकट्या भावाचे नाव शंकरराव होते.

कान्हेरे १९०३ मध्ये आपल्या काकांकडे पुढील शिक्षणासाठी औरंगाबादला गेले. त्यांचे भाऊ गणपतराव बार्शी येथे राहत होते. त्यांच्याकडे काही काळ राहून १९०८



मध्ये ते पुन्हा औरंगाबादला परत गेले. तेव्हा ते गंगाराम रुपचंद श्रॉफ यांच्या घरात भाड्याने राहत असत. गंगाराम यांचा येवल्यात टोणपे नावाचा एक मित्र होता. त्या काळात अनेक गुप्त क्रांतिकारी संस्था कार्यरत होत्या. नाशिकमधील एका गुप्त संस्थेचा टोणपे हे सदस्य होते. गणू वैद्य आणि गंगाराम एकदा नाशिकमधील गुप्त क्रांतिकारी संस्थेसाठी शस्त्रे खरेदी करण्यासाठी केले होते. या वैद्यांशी कान्हेरे यांची ओळख झाली. नंतर कान्हेरे यांनी त्या दिवसातील मैत्रीबद्दल 'मित्र प्रेम' नावाची कादंबरी लिहिली. कान्हेरे क्रांतिकारी गटांच्या कार्याकडे आकर्षित झाले. सावरकर बंधूनी नाशिक येथे अभिनव भारत संस्थेची स्थापना केली होती. कृष्णाजी गोपाळ कर्वे यांनी बाबाराव सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली अशाच एका गुप्त गटाची स्थापना केली होती. या संस्थेचे दुसरे सदस्य विनायक नारायण देशपांडे होते. २सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून स्फूर्ती घेऊन अनंत कान्हेरे ह्यांनी नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याला ठार मारण्याचे ठरविले. त्याला कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे अशा समवयस्क साथीदारांची जोड मिळाली.

जॅक्सनची मुंबई येथे वरच्या पदावर बदली करण्यात आली. त्याला नाशिक येथेच मारणे जास्त सोपे होते. २१ डिसेंबर १९०९ या दिवशी नाशकातल्या विजयानंद थिएटरमध्ये 'शारदा' या नाटकाचा प्रयोग जॅक्सनच्या निरोप समारंभासाठी ठरला होता. जॅक्सन मराठी भाषेचा आणि नाटकांचा चाहता असल्याने या प्रयोगास येणार होताच. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याची वेळ झाली, सर्वजण आपापल्या जागेवर स्थानापन्न होत असताना अनंत कान्हेरे ह्यांनी जॅक्सनवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. जॅक्सन जागीच ठार झाला. अनंत कान्हेरे आपल्या जागेवरच शांतपणे उभे राहिले, त्यांना अटक करण्यात आली. कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांच्यावर खटला भरण्यात आला. २० मार्च इ.स. १९१० रोजी तिघांनाही फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९ एप्रिल १९१० या दिवशी तिघांनाही ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. ठाण्याच्या तुरुंगात अनंत कान्हेरे यांचे स्मारक आहे. नाशिकमध्ये 'अनंत कान्हेरे' नावाचे क्रिकेटचे मैदान आहे.

**(साभार : विकिपीडिया)**

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्यावी -खासदार तटकरे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली चर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणातील जनतेच्या दीर्घकालीन प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नवी दिल्ली येथे महत्वपूर्ण भेट घेतली. या भेटीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग (NH-६६) तसेच इंदापूर आणि माणगाव बायपाससारख्या अत्यावश्यक प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



कोकणातील नागरिक अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामांमुळे त्रस्त आहेत. वारंवार होणारे अपघात, वाहतूक कोंडी आणि प्रवासातील विलंब यामुळे स्थानिकांच्या जीवनावर मोठा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार तटकरे यांनी मंत्री गडकरी यांच्यासमोर कोकणवासीयांच्या भावना अत्यंत संवेदनशीलतेने मांडत, उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

यावेळी इंदापूर आणि माणगाव बायपास प्रकल्पांचा विशेष उल्लेख करण्यात आला. या बायपासमुळे शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होणार असून, स्थानिकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाचा मार्ग खुला होणार आहे. तसेच, महामार्गावरील रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याची अत्यंत गरज अधोरेखित करण्यात आली. या कामांसाठी रेल्वे प्रशासन आणि महामार्ग विभाग यांच्यात तातडीने समन्वय साधण्याचे निर्देश देण्याची मागणी तटकरे यांनी केली.

खासदार तटकरे यांनी सांगितले की, "कोकणातील जनतेचा विकास हा माझा सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. महामार्गाचे अपूर्ण काम केवळ विकासात अडथळा नाही, तर लोकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण करत आहे. त्यामुळे ही कामे युद्धपातळीवर पूर्ण होणे अत्यावश्यक आहे."

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत, संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे.

या भेटीमुळे कोकणातील नागरिकांच्या आशा पुन्हा जागृत झाल्या असून, रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत जलद होते, याकडे संपूर्ण कोकणवासीयांचे लक्ष लागले आहे.

## नागोठण्यात पत्नीच्या आजारपणामुळे पतीची आत्महत्या

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील आंगरआळी परिसरात राहणाऱ्या बिहार राज्यातील एका इसमाने नैराश्याच्या भरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. ही घटना शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी रात्री १० ते शनिवार दि. १८ एप्रिल रोजी पहाटे १ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत नागोठणे पोलीस स्टेशनमध्ये शनिवार दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ५.२० वाजता अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ६/२०२६ अशी नोंद करण्यात आली असून पुढील तपास प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुगल सुरज राय (वय ५० वर्ष), मूळ राहणार बाजीतपूर, ता. शरार रंजन, जिल्हा समस्तीपूर (बिहार) हे सध्या नागोठणे येथील आंगरआळी परिसरातील वर्तक वाड्यातील चाळीतील रूम क्रमांक २३ मध्ये राहत होते. त्यांच्या पत्नीच्या आजारपणामुळे ते मानसिक नैराश्यात होते. त्यातूनच त्यांनी राहत्या घरातील मोरीच्या वर सुमारे १० फूट उंचीवर असलेल्या लाकडी वास्यावर ओढणी बांधून गळफास घेत आत्महत्या केली.

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचा ५९१ लाभार्थ्यांनी घेतला लाभ



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ग्रामीण परिसर म्हणून ओळखला जाणारा कशेळे हा आदिवासी बहुल म्हणून ओळखला जातो. या परिसरामधील नागरिकांना कर्जतला जाऊन महसूल मंडळाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी फेऱ्या माराव लागत असत. त्यासाठीच महसूल मंडळाचे सर्व अधिकारी एकाच ठिकाणी आणून शिबिर आयोजित करण्यात आले होते. ५९१ लाभार्थ्यांनी समाधान शिबिरामध्ये लाभ घेण्यात आला.

उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश संकपाळ व कर्जत तहसीलदार डॉक्टर धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या मंडल अधिकारी किरण बेलोस्कर व बाबासो शेटे यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर कशेळे व पाथरज मंडल अधिकारी यांच्या अंतर्गत राबविण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या वर्षा दोरे, पंचायत समिती सदस्य नितीन धुळे, अजित पवार, रवींद्र दळवी, भास्कर दिसले, दिलीप ताम्हाणे, अरुण हरपुडे, राजेंद्र शिरसागर, भूषण पेमारे आदी उपस्थित होते.

भीमाशंकर च्या पायथ्यापासून ते कोथळीगडाच्या पायथ्याशी असलेल्या व जामरूख परिसरातील लाभार्थ्यांना शिबिरामध्ये योजनेचा लाभ मिळाला. या शिबिरामध्ये विशेष म्हणजे उमंग संस्थे मधील अपंग मुलांना आज पासून ते त्यांचे आयुष्य असेपर्यंत त्यांना पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. यासाठी तलाठी मॅडम यांनी प्रत्यक्ष उमंग संस्थेमध्ये जाऊन २५ लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेऊन मंजुरीही करण्यात आले. यामध्ये महसूल विभागातील उत्पन्नाचे दाखले ११७, जात प्रमाणपत्र १३, अधिवास प्रमाणपत्र ६, आधार कार्ड ३२, भूमी अभिलेख आकारपोटपत्र २, लाभार्थ्यांचा सहभाग दर्शनात आला. तसेच कृषी व इतर योजना ॲग्री स्टॅक २६, निवडणूक विभाग कार्ड १९, संजय गांधी निराधार योजना ३१, पुरवठा विभाग ४४, आरोग्य विभाग एक्स-रे ४३, डोळे तपासणी ३७, एचडी ५४, सर्वसाधारण आरोग्य तपासणी १६७, अशा एकूण ५९१ लाभार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजास्व समाधान शिबिर अभियान मंडल कशेळे लाभ घेतला.

## मुरुड शहर व ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करा -माजी आमदार पंडित पाटील

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील मोऱ्यांच्या कामात उशीर न करता त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने सुपेगाव रोहा मार्ग सुद्धा अद्यवत करून घ्यावा कारण या रस्त्यास ऊसरोल ते फणसाड अभयारण्य भागात सर्वाधिक खड्डे पडले असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गाने हे खड्डे तत्काळ भरून प्रवासी वर्गाला दिलासा द्यावा अशी मागणी यावेळी माजी आमदार पंडित पाटील यांनी केली आहे.



मुरुड नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या दालनात त्यांनी मुरुड शहर व ग्रामीण भागाचा आढावा घेतला यावेळी मुरुड नगरपरिषद मुख्याधिकारी सचिन बच्छाव,कर निरीक्षक अनिकेत जगदाळे,कार्यालयीन प्रशासक आंबेटकर,सार्वजनिक बांधकाम उप अभियंता सांगळे ,व सर्व मुरुड नगरपरिषद अधिकारी, जिल्हा उपाध्यक्ष युवा मोर्चा भाजप नंदेश यादव,रमेश दिवेकर,धर्मजी हिरवे,राजेश दिवेकर,विजय म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भाजप नेते व माजी आमदार पंडित पाटील यांनी सांगितले की, मुरुड साळाव रस्त्याचे काम सुरू असल्याने लोक सुपेगाव मार्गाचा अवलंब करत आहेत. परंतु हा रस्ता खड्डेमय असल्याने लोकांना खूप त्रास तसेच दुचाकी स्वार यांचे अपघात होत आहेत. तरी सार्वजनिक बांधकाम मुरुड खात्याने अग्रक्रम घेऊन हा संपूर्ण रस्ता खड्डेमुक्त करावा यातील काही भाग रोहा विभागास मिळत असेल तर मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाने रोहा विभाग यांच्याशी संपर्क करून लवकरात लवकर खड्डे भरून घेण्याच्या सूचना यावेळी पाटील यांनी दिला आहे.

मुरुड नगरपरिषदेने तवसळकर व माडी केंद्र येथील लगत असणारी मोरी मधील कचरा व घाण साफ करून या मोरीच्या नूतनीकरण करून घेऊन प्रवासी वर्गाला दिलासा देण्याची मागणी सुद्धा यावेळी त्यांनी केली आहे.

लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्व अधिकारी वर्ग यांनी कार्यालयात जास्तीत जास्त वेळ उपस्थित रहावे . पावसाळ्यापूर्वीची कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी वर्गास दिल्या आहेत.

## विळेवरचीवाडीत पाणपोई सुरू; प्रवाशांसह स्थानिकांना दिलासा

**माणगाव : प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाच्या तीव्र झळांमुळे सामान्य नागरिक व प्रवाशांचे हाल होत असताना, विळे वरचीवाडी रिक्षा स्टॅन्ड, भीरा-कोलाड नाका येथे दिनांक १७ मार्च २०२६ रोजी पाणपोईची सुरूवात करण्यात आली. या उपक्रमामुळे प्रवासात असलेल्या नागरिकांना आणि स्थानिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ही पाणपोई सामाजिक बांधिलकी जपत कुमार सिद्धेश देवेंद्र पाबेकर यांच्या सौजन्याने सुरू करण्यात आली. उद्घाटन प्रसंगी महिला आघाडीच्या विभागीय अध्यक्षा देविकाताई पाबेकर यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते महादेवजी ताम्हणकर, माजी उपसरपंच शाम तवटे, संतोष बामणे, विले विभागाचे सचिव प्रवीण सावंत, तसेच प्रमोद लाड यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, समाजासाठी अशा उपक्रमांची आजच्या काळात अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले.

सध्या तापमानात झपाट्याने वाढ होत असून, दुपारच्या वेळेत प्रवास करणाऱ्या रिक्षाचालक, कामगार, विद्यार्थी व नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत आहे.




## भाकरीवाले पाटील महिला स्वयंसहाय्यता समूहाची झेप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण महिलांच्या जिद्दी, एकजुटी आणि कष्टातून उभी राहिलेली यशाची प्रेरणादायी कहाणी म्हणजे भाकरीवाले पाटील महिला स्वयंसहाय्यता समूह. अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील या समूहाने घरगुती व्यवसायातून सुरुवात करत आज यशस्वी हॉटेल व्यवसाय उभारून एक आदर्श निर्माण केला आहे.

सन १९ ऑक्टोबर २०१८ रोजी स्थापन झालेल्या या समूहाच्या उद्योजिका सौ. वैभवी चंद्रकांत राऊळ यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी आपल्या कष्टाच्या जोरावर व्यवसायाला नवी दिशा दिली. सुरुवातीला अलिबाग परिसरातील पर्यटन क्षेत्र लक्षात घेऊन हॉटेलांना भाकरी पुरवण्याचा व्यवसाय सुरू करण्यात आला. मागील अनेक वर्षांपासून महिलांकडून चालत आलेल्या या पारंपरिक व्यवसायाला त्यांनी संघटित रूप दिले.

अलिबाग, नागाव, काशीद, मुरुड या पर्यटन स्थळांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असल्याने हॉटेल व्यवसायाला चांगली मागणी होती. या संधीचा लाभ घेत महिलांनी भाकरी पुरवठा व्यवसाय विस्तारला. त्यानंतर त्यांनी घरगुती होमस्टे सुरू केला, ज्याला ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. अस्सल घरगुती चव आणि महिलांच्या हातची खासियत यामुळे ग्राहकांची पसंती मिळत गेली.

या यशाच्या जोरावर जानेवारी २०२३ मध्ये सहान बायपास रोड, अलिबाग येथे "भाकरीवाले पाटील लंच होम" या नावाने पहिली शाखा सुरू करण्यात आली. अल्पावधीतच या हॉटेलला मोठा प्रतिसाद मिळाला. वाढत्या मागणीमुळे १५ ऑगस्ट २०२३ रोजी अलिबाग शहरात कलेक्टर कार्यालयासमोर हिराकोट तलावाजवळ दुसरी शाखा सुरू करण्यात आली.

उमेद अभियानात सहभागी झाल्यानंतर समूहाच्या कार्याला अधिक बळ मिळाले. महिलांनी एकत्र येऊन मोठ्या बाजारपेठेत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आणि व्यवसायातही विस्तार झाला. तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील उमेद अभियान व्यवस्थापन कक्षाकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे समूहाने राज्य व देशपातळीवर आपली ओळख निर्माण केली.

समूहाला महालक्ष्मी सरस २०२३-२४ मध्ये देशभरातील समूहांमध्ये सर्वाधिक विक्री केल्याबद्दल गौरविण्यात आले, तसेच "सावित्री रत्न पुरस्कार २०२४" नेही सन्मानित करण्यात आले आहे. आर्थिक बळकटीसाठी समूहाने सुरुवातीला बँक ऑफ इंडिया, अलिबाग शाखेकडून ३ लाख रुपयांचे कर्ज घेतले व त्याची वेळेत परतफेड केली. त्यानंतर त्यांना ६ लाख रुपयांचे अर्थसहाय्य प्राप्त झाले. बँकेकडून तसेच लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर विजयकुमार कुलकर्णी यांचे मार्गदर्शनही लाभले.उमेद अभियानांतर्गत फिरता निधी, समूह कर्ज व ग्रामसंघामार्फत विविध आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे व्यवसाय वृद्धीस चालना मिळाली. बँकिंग प्रणालीच्या मदतीने महिलांनी स्वतःचा व्यवसाय अधिक सक्षम केला. आज या समूहाच्या यशामुळे महाराष्ट्रातील विविध भागांतून शाखा सुरू करण्यासाठी प्रस्ताव येत आहेत.

## मुरूड-बोरीवली एसटी सकाळी ६ वाजता सुरू करा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड-बोरीवली सकाळी ६ वाजता व बोरीवली वरुन मुरूडला रात्री १० वाजता नविन बस(एसटी) सुरू करुन प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी मुरूड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी राज्य परिवहन मंडळ रायगड विभागीय नियंत्रक यांच्या कडे निवेदन व्दारे मागणी केली आहे.या निवेदनाची प्रत मुरूड आगार व्यवस्थापक राहुल शिंदे यांच्या कडे देण्यात आली आहे.

मुरुड तालुक्यातील अनेक नागरिक कामासाठी बोरीवली,दहिसर, कांदिवली, गोरेगाव विविध परिसरात वास्तव करित आहेत. बोरीवली हे मध्यवर्ती ठीकाण असल्यामुळे त्याचा फायदा स्थानिक रहीवाशी असलेल्या प्रवाश्यांना व पर्यटकांना मोठ्या प्रमाणात होईल.जशी आपण मुरूड वरून सकाळच्या वेळेत मुंबई सेंट्रल ला जाण्यासाठी गाडी सोडण्यात येते. त्याचप्रमाणे काही मिनिटांचा अंतर सोडून मुरूड बोरीवली सकाळी ६:०० कींवा ६:३० वाजता च्या दरम्यान सोडावीत व तीच गाडी रात्री १० किंवा १०.३० वाजता दरम्यान सोडल्यास मोलमजुरी करता गेलेल्या स्थानिक नोकरदार वर्गाला फायदा होणार आहे

## रोह्यात वाहतूक पोलिसांचा मद्यधुंद, अल्पवयीन वाहनचालकांवर बडगा; धडक कारवाईचे स्वागत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरात वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून सुरू असलेल्या धडक कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. राजकीय नेते असोत वा सामान्य नागरिक, कायद्यापुढे सर्व समान असल्याचा संदेश या मोहिमेतून दिला जात असून, नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कारवाई केली जात आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या सूचनेनुसार रोह्यात विशेष कारवाई पथके तयार करण्यात आली असून अष्टमी पूल पोलीस चौकी, खारी पोस्ट तसेच तांबडी पोस्ट येथे वाहन तपासणी मोहीम सुरू आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी मद्यपान करून वाहन



चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. ब्रेथ अनालायझर मशीनद्वारे चालकांची तपासणी केली जात असून, संशयित चालक आढळल्यास ब्लड टेस्ट करून संबंधितांना न्यायालयात हजर केले जात आहे. अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून दहा हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

यासोबतच मोठ्या अवजड गाड्या, विशेषतः लोखंड व कोळसा वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांवरही पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. कागदपत्रे, लायसन्स, ओव्हरलोडिंग, वेगमर्यादा तसेच मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांची तपासणी केली जात आहे. रात्रीच्या वेळी काही मोठी वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने अपघाताचा धोका वाढत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वाहनांमुळे होणारा त्रास लक्षात घेता त्यांच्यावर विशेष कारवाईची मागणीही नागरिकांकडून होत आहे



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या **मौजे** - दिघोडे **तालुका** - उरण , **जिल्हा रायगड** येथील विद्यमान मालक १. सौ रंजना दशरथ जोशी,२.सौ. सुमती शंकर ठाकुर यांचे मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकती असून सदरच्या मिळकती आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीचे करारनामा करण्यांचे आहेत. परिशिष्टात वर्णनाते नमुद केलेल्या मिळकतीचे करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

-: मिळकतीचे वर्णन :-

**मौजे** - दिघोडे **तालुका** - उरण , **जिल्हा रायगड येथील मिळकत.**

| अ.नं. | सर्व्हे नं. /हिस्सा | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| १ | ३८ /३ | ०-८८-३० पो.ख.०-०७-३० | २.५६ |
| | | एकूण ०-९५-६० **पैकी ०- १६- ० गुंठे अविभाज्य क्षेत्राचा व्यवहार** | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट समझोता करार, साठेकरार, विक्रीविनीमय गहाण, बोजा, दान, पोटगी वारसाहक्क, ट्रस्ट न्यास भाडेपटटा सबलिज, अंडरलिज वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह , लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करण्यांत याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहारातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १८/०४/२०२६**

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

पत्ता.:- ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी पी पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हास्पीटल जवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल जि, रायगड ४१० २०६ फोन नं. ८६८९८०९८९६ ८१०८८८२६११

# गव्हाण फाटा-चिरनेर मार्गावरील कंटेनर मालवाहतूक रेल्वे ओव्हरहेड पुलाचे उद्घाटन

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील वाहनांना व नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मागील तीन वर्षांपूर्वी पाडण्यात येऊन नव्याने मध्यरेल्वेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या गव्हाण फाटा-चिरनेर मार्गावरील कंटेनर मालवाहतूक रेल्वे ओव्हरहेड पूलाचे उद्घाटन गव्हाण फाटा वाहतूक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक राजाराम मांढरेकर हस्ते व मध्यरेल्वेचे अधिकारी श्रीवास्तव यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



या तीन वर्षे रखडपट्टीत अडकलेल्या रेल्वे पुलाचे उदघाटन करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याने या मार्गावरील प्रवासी आणि वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

मार्चअखेर पूर्ण होणारे हे पुलाचे काम शनिवारी (दि. १८) सकाळी १०.३० वाजता उदघाटन करण्यात आले आहे.हा पूल वाहतुकीस खुला झाल्यामुळे दैनंदिन पाच हजार प्रवासी व वाहनचालकांची प्रतिक्षा संपणार असून, दरररोजची मागील तीन वर्षांपासून होणारी गैरसोय दूर होणार असल्याने त्यांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे उरण पूर्व विभागातील चिरनेर,आवरे वशेणी, केळवणे खोपटा मार्गांवरील एसटी बस प्रवास सुरु होऊन रिक्षा व अन्य वाहनातून नागरिकांना पनवेल,मुंबई, नवीमुंबई व ठाणे मार्गांकडे जाण्यासाठी सुलभ झाले असून, प्रवास सुखकर व सोपा बनला आहे.

त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेआहे. तीन वर्षे प्रतिक्षेत असलेल्या प्रवाशांची प्रतिक्षा काल या पुलाच्या झालेल्या उदघाटनानंतर संपुष्टात आली आहे.एक किमी वळसा घेऊन जाणाऱ्या वाहनांसाठी एप्रिल अखेरीस हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून, यावेळी टीआयपीएल अभियंता सतिश उगले, क्षितिज पांडे, आनंद मोर्या, प्रताप साहू, संदीप बोर्डे, व आर. जी. ठाकूर, गव्हाण फाटा वाहतूक शाखेचे पोलिस नायक रुपेश दराडे आणि त्यांचे वाहतूक पोलिस सहकारी उपस्थित होते.

# शाळांमध्ये तातडीने समुपदेशक नेमण्याची मागणी

**स्त्री शक्ती फाऊंडेशनचे निवेदन**

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील दहावीचा विद्यार्थी रौनक बाथमने परीक्षेत कमी गुण मिळाल्याने आत्महत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या पार्श्वभूमीवर, स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष विजया कदम यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पत्र लिहून विद्यार्थ्यांमधील वाढता मानसिक ताण आणि विस्कळीत शैक्षणिक व्यवस्थेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. प्रत्येक शाळेत पूर्णवेळ समुपदेशक नेमण्यासह शिक्षण क्षेत्रातील गोंधळ दूर करण्याची मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

१५ एप्रिल रोजी रौनक या विद्यार्थ्यांने गुण कमी मिळाल्याच्या विवंचनेतून केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर मुलांचे मानसिक आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे. टोकाचे पाऊल उचलले. या हृदयविदारक घटनेचा संदर्भदेत विजया कदम यांनी पत्रात म्हटले आहे की, एका स्वप्न पाहणाऱ्या मुलाने उमलण्या आधीच गळून पडावे, हे समाजाचे मोठे अपयश आहे. केवळ गुण म्हणजे यश, ही चुकीची धारणा आणि पालकांच्या अवास्तव अपेक्षा मुलांच्या जीवावर बेतत असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांचे जीठा वाचवण्यासाठी विजया कदम यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक शाळेत प्रशिक्षित पूर्णवेळ समुपदेशकाची नियुक्ती अनिवार्य करावी. इयत्ता ८ वी ते १२वी च्या अभ्यासक्रमात 'ताण व्यवस्थापन' हा विषय अनिवार्य करावा. नवीन पाठ्यपुस्तके तातडीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावीत आणि अभ्यासक्रम बदलाबाबत स्पष्ट परिपत्रक काढावे.

२४ तास टोल-फ्री मानसिक आरोग्य हेल्पलाईन सुरू करावी. 'गुण म्हणजे सर्वस्व नव्हे' हा संदेश देण्यासाठी देशव्यापी मोहीम राबवावी.

विजया कदम यांनी पत्रात केवळ मानसिक ताणच नव्हे, तर प्रशासकीय त्रुटींवरही बोट ठेवले आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही इयत्ता ९ वी ची नवीन पाठ्यपुस्तके बाजारात उपलब्ध नाहीत. ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आले आहेत. मात्र, त्याबाबत शिक्षक आणि विद्यार्थ्यांना कोणतेही स्पष्ट मार्गदर्शन नाही.

# स्थायी समितीच्या बैठकीत विकासकामांना मंजुरी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ता १७ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत सुमारे १० कोटीच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. स्थायी समिती सभापती अशोक पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झालेल्या या बैठकीत विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली.

यावेळी ऐरोली विभागातील दिवा गांव येथील जनाई निवास अपार्टमेंट ते भिमा निवास अपार्टमेंट समोरच्या गटार व पदपथांची सुधारणा. तुर्भे विभागातील इंदिरांनगर येथील क्रिष्णा ज्वेलर्स ते इंदिरानगर कमानी पर्यत रस्त्यांचे कॉक्रिटीकरण व ड्रेनची सुधारणा. बेलापुर विभागातील सीबीडी येथील भुखंड क्रमांक १५४ च्या छताला डिझायनर रुफ बसवण्याची सुविधा, वाशी सेक्टर १६ येथील कडोमिनियम अंतर्गत जुन्या मलनिसारण वाहिन्या बदलून नवीन मलनिस्सारण वाहिन्या टाकणे. तुर्भे विभागातील कोपरी गाव सेक्टर २६ येथील विलास पाटील यांचे घर ते भवानी मंदिर पर्यतच्या पदपथाची सुधारणा.

वाशी गाव येथील रस्त्याची टीडब्लूटी ने सुधारणा करणे. सानपाडा सेक्टर २० येथील केसर सोलिटर बिल्डिगर जवळ ड्रेन बांधणे. बेलापुर येथील मुख्यालयाच्या इमारती मधील हाऊस किंपिग कामाला वाढीव मुदत. नेरुळ सेक्टर ४८ येथील लखानी टॉवर ते ओम सागर सोसायटी लगत पदपथाची स्टॅप कॉक्रिटीकरणांद्वारे सुधारणा करणे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ९४ कोपरखैरणे या शाळेस शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी संस्था नियुक्ती करण्यात आली आहे.

# 'गोल्ड व्हॅल्यूअर्स'च्या मागण्या होणार पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यांतील गोल्ड व्हॅल्यूअर्स असोसिएशनने सरकारकडे ज्या मागण्या केल्या आहेत. त्याबाबत सरकार गांभीर्याने विचार करत असून काही मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गांभीर्याने घेतल्या आहेत. लवकरच एक बैठक घेऊन मागण्या पूर्ण करूअसे आश्वासन सहकार राज्यमंत्री तथा गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी गोल्ड व्हॅल्यूअर्स असोसिएशनने मुंबईत आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्यात व्यक्त केले.

सोनार समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रभावी पाठपुरावा करून न्याय मिळवून देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.आमदार चित्रा वाघ यांनी विधान भवनात सोनार समाजाच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडून त्यावर मार्ग काढण्यासाठी पाठपुरावा केला. सोने गहाण ठेवण्याच्या प्रकियेत हा घटक खूप महत्त्वाचा असतो. असेही चित्रा वाघ यांनी म्हटले.प्रमुख मार्गदर्शक संजीव खडके, अध्यक्ष डॉ राजेंद्र दिंडोरकर, कार्यकारी सचिव सतीश पितळे, खजिनदार दीपक देवरुखकर, उपस्थित होते.

# दिघोडे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**उरण : वार्ताहर**

१७ एप्रिल २००६ रोजी मौजे दिघोडे ता उरण येथे महसूल विभाग महाराष्ट्र शासन यांच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर आयोजीत करण्यात आले होते.




या शिबीर प्रसंगी उपस्थित नागरिकांना उरण तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांनी महाराष्ट्र शासनाच्चा विविध योजनांचा नागरीकांनी लाभ घ्यावा असे अवाहन केले. पाणंद रस्ता,जिवंत ७/१२, SIR, जणगणना, या बाबतीत जनतेला सविस्तर अवगत केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ यांनी विभागाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित नागरिकांना दिली.

या शिबिरात शेतकऱ्यांना त्यांचे दुरुस्त केलेले ७/१२, फेरफार उतारे, उत्पन्नाचे दाखले, नॉन क्रीमियर दाखले, रेशन कार्ड, संजय गांधी लाभार्थी, मिळालेल्या लाभाचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.शिबिरात नवीन संजय लाभार्थी अर्ज १५ स्वीकारले; नवीन उत्पल दाखले अर्ज ४४ स्विकारले, रेशन कार्ड अर्ज प्रत्यक्षात जागेवरच दुरुस्ती देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत १५% निधीमधून बाबासाहेब आंबेडकर नगर दिघोडे मधील १५ लाभार्थी यांना सौर पॅनल चे वाटप करव्यान आहे'

सदर शिबीर प्रसंगी जि.प.सदस्य डॉ.मनिष पाटील , उरण तहसीलदार डॉ.उध्दव कदम,गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील,तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ,सहायक कृषी अधिकारी विभावरी चव्हाण,महसूल नायब तहसीलदार रविंद्र सानप,सरपंच कीर्तीनिधी ठाकूर, मंडळ अधिकारी मनिष जोशी, मंडळातील ग्राम महसूल अधिकारी अमित दुलगज , सत्यवान पाटील निहालसिंग जसवाल ग्रापंचायत सदस्य,ग्रामसेविका, कर्मचारी आदी सह परिसरातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते -शिबिराचे आयोजन दिघोडे ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच कीर्तिनिधी ठाकूर यांनी सुंदर रित्या पार पाडले.

# ब्रह्माकुमारीजतर्फे पनवेलमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

प्रजापिता ब्रह्माकुमारीज माऊंट आबू तर्फे तसेच समाज सेवा प्रभाग (RERF) यांच्या सहकार्याने पनवेल ब्रह्माकुमारीजतर्फे 'संगम गौरवपूर्ण वृद्धावस्था एवं सन्मानित जीवन' हा ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यक्रम पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.



या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक सभेच्या उपाध्यक्ष श्रीमती माधुरी गोसावी, सचिव सुनील खेडेकर तसेच पनवेल ब्रह्माकुमारीजच्या मुख्य संचालिका राजयोगिनी तारादिदी उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सचिन परब उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर डॉ. सचिन परब यांचे ज्येष्ठ नागरिक सभेतर्फे व पनवेल ब्रह्माकुमारीजतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. सचिन परब यांनी ज्येष्ठ नागरिकांना अत्यंत मोलाचे विचार दिले. "उबुन्टु" या संकल्पनेद्वारे "आपण सगळ्यांनी मिळून एकत्र राहणे आवश्यक आहे" हा संदेश त्यांनी प्रभावीपणे मांडला. आजच्या काळात अनेक वृद्धांना वृद्धाश्रमात राहावे लागते याबद्दल त्यांनी खंत व्यक्त करत, एकटेपणा टाळण्यासाठी एकमेकांशी संवाद साधा, भावना व्यक्त करा आणि मन मोकळे ठेवा, असे आवाहन केले.

ज्येष्ठ नागरिक सभेचे १००० हून अधिक सभासद असल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन करत. त्यामुळे एकटेपणाची भावना कमी होण्यास मदत होईल असे नमूद केले तसेच या वयात भावनिक गुंतवणूक कमी ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला, कारण त्यामुळे अपेक्षाभंगाचे दुःख कमी होते.

मनात काहीही दडवून न ठेवता व्यक्त होणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगत त्यांनी "मनात गाठी तयार करू नका" हा संदेश दिला. यावेळी त्यांनी उपस्थितांना हात उंच करून मूठ घट्ट बंद करून नंतर हळूहळू सैल सोडण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले आणि मूठ सैल सोडल्यावर कसे हलके वाटते हे त्यांनी समजावून सांगितले.

विज्ञानानेही हे मान्य केले आहे की मनातील ताणतणावाचा शरीरावर परिणाम होतो, असे सांगत त्यांनी हृदयविकार आणि कर्करोगासारख्या आजारांपासून बचावासाठी सकारात्मक विचार आणि मोकळेपण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले तसेच वाढत्या वयात खळखळून हसणे आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले. वयोमानानुसार स्मरणशक्ती घटण्याच्या समस्येबाबत बोलताना त्यांनी नियमित राजयोग मेडिटेशन करण्याचा सल्ला दिला.

मृत्यूबद्दलचे भय कमी करण्यासाठी त्यांनी आत्म्याबद्दल मार्गदर्शन करत "आपण शरीर नसून आत्मा आहोत" हा आध्यात्मिक दृष्टिकोन स्पष्ट केला. आत्मा अमर असून एक शरीर सोडून दुसरे धारण करतो, हा आत्म्याचा प्रवास आहे, असे त्यांनी सांगितले. ध्यान करून घेतल्यानंतर उपस्थितांनी शांत, हलके आणि आनंदी वाटल्याची भावना व्यक्त केली.

यानंतर राजयोगिनी तारादिदी यांनी एकटेपणा दूर करण्यासाठी परमपिता परमात्म्याशी नाते जोडण्याचे महत्त्व सांगितले. त्याच्याशी विविध नात्यांनी जोडल्यास जीवनात खरे सुख, शांती आणि आनंद मिळतो, असे त्यांनी नमूद केले तसेच राजयोग मेडिटेशन कोर्स करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजयोगिनी शकुंतलादिदी यांनी सुरेखरीत्या केले. शेवटी उपाध्यक्ष माधुरी गोसावी व सचिव सुनील खेडेकर यांनी प्रमुख पाहुणे व आयोजकांचे आभार मानले. पनवेल ब्रह्माकुमारीजतर्फे सर्व ज्येष्ठ नागरिकांचा टिळा लावून सन्मान करण्यात आला

# महापालिकेच्या अधिकारी वॉशरूममध्ये पडल्या बेशुद्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त शिल्पा देशपांडे यांना कामाचा अतिरिक्त ताण आल्याने अचानक चक्कर येऊन त्या बेशुद्ध पडल्या. ही घटना महापालिका मुख्यालयात बुधवारी दुपारच्या सुमारास घडली असून यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

वॉशरूममध्ये अधिकारी बेशुद्ध पडल्याचे इतर महिलांना दिसून आले. ही बाब त्यांनी सुरक्षा रक्षकांना सांगितली. महिला सुरक्षा रक्षकांनी तातडीने धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सुरक्षा रक्षकांनी आणि इतर कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नेरूळ येथील मीनाताई ठाकरे रुग्णालयात हलवले. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून असलेल्या कामाच्या प्रचंड ताणामुळे त्यांना हा त्रास जाणवल्याचे बोलले जात आहे. सध्या डॉक्टरांचे एक पथक त्यांच्यावर उपचार करत असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

शिल्पा देशपांडे यांचे वय ५६ वर्षे असून गेली २८ वर्षे नवी मुंबई महानगर पालिकेत त्या कार्यरत आहेत. गेल्या वर्षभरापासुन त्या परवाना विभागाच्या सहायक आयुक्त म्हणून पदावर कार्यरत आहेत. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# उष्णतेचे प्रमाण वाढू लागल्याने आरोग्य सांभाळण्याचे महापालिकेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसापासून उन्हाची तीव्रता वाढू लागली आहे. येथून पुढील काही दिवसांमध्ये उन्हाळ्याची तीव्रता अधिक वाढणार आहे, अशा सूचना भारतीय हवामान विभागाने दिल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. महत्त्वाच्या कामाशिवाय भर दुपारी उन्हात जाणे नागरिकांनी शक्यतो टाळावे, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

**हे करावे!**

शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्या, तहान लागली नसली तरीही थोड्या थोड्यावेळाने पाणी पीत रहावे. प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.ओरल रीहायड्रेशन सोल्यूशन (ORS) वापरा आणि लिंबू पाणी, ताक/लस्सी आणि फळांचे रस



यांसारखे घरगुती पेये प्यावे.टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर तसेच स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारखी उच्च पाणी सामग्री असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात.पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे घालावे. तुमचे डोके झाकून ठेवा. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना छत्री, टोपी, टॉवेल आणि इतर पारंपारिक साधनांचा वापरावे.घराच्या सूर्यप्रकाशाच्या बाजूला, थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटा रोखा. दिवसा खिडक्या आणि पडदे बंद ठेवावे. थंड हवा येण्यासाठी रात्री खिडक्या उघड्या कराव्यात.जर तुम्ही घराबाहेर जात असाल, तर तुमची घराबाहेरील कामे दिवसाच्या सकाळ आणि संध्याकाळ वेळेपर्यंत मर्यादित करावी.दिवसाच्या थंड वेळांमध्ये बाहेरील कामांचे नियोजन करावे.उष्णतेचा ताण आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा त्रास असलेल्या संवेदनशील किंवा जास्त जोखीम असलेल्या लोकांनी अधिक काळजी घ्यावी. घर थंड ठेवा; पडदे, शटर किंवा सनशेड वापरा आणि रात्री खिडक्या उघडा.शरीर थंड करण्यासाठी पंखा, स्प्रे बाटल्या, ओलसर कापड आणि बर्फाचे टॉवेल वापरावा.पाण्यात पाय बुडवल्याने निर्जलीकरण आणि शरीराची उष्णतेमुळे होणारी अस्वस्थता कमी होऊन जलद थंडावा मिळतो.

**हे करू नका!**


उन्हात बाहेर पडणे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ या वेळी बाहेर असताना कठोर परिश्रम टाळा.अनवाणी बाहेर जाऊ नका..अति उष्णवेळेत स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाक क्षेत्र पुरेशा प्रमाणात हवा येणासाठी दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात.अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड सॉफ्ट ड्रिंक्स किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेले पेय टाळा, कारण यामुळे शरीरातील जास्त पाणी कमी होते

# श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी

**उरण : वार्ताहर**

उरण शहरात अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराज पूण्यतिथी बुधवार (दि. १५) करण्यात आली.

उरण शहरातील आनंदनगर येथील



श्री स्वामी समर्थ मठात सकाळपासूनच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ८ वाजता भूपाळी आरती करण्यांत आली. सकाळी ८.१५ वाजता राजशेखर म्हात्रे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. सकाळी १०.३० वाजता आरती, सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत भजन, सायंकाळी ६.३० वाजता आरती करण्यात आली, सायंकाळी ४ ते ५ स्वामी समर्थ भजन मंडळ यांचे भजन ,७ ते ९ वाजेपर्यंत सुप्रिया घरत व तुषार घरत, यांचे गुरुकृपा प्रासादिक महिला भजन मंडळ यांचे भजन, दिवसभर स्वामी भक्तांनी दर्शनाचा व तीर्थप्रसादाचा लाभ घेतला.

# पाले गावात भवानी मातेचा उत्सव

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी देवीच्या यात्रा, उत्सव सुरु आहेत.उरण तालुक्यातील पाले गावात आई भवानी मातेचे जागरण तसेच आई भवानी मातेचा उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी मंडळाचे सभासद अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी,खजिनदार सल्लागार व सर्व सभासद, ग्रामस्थ तसेच वेगवेगळ्या पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



पंचायत समिती सदस्य प्रारंभी अविनाश गावंड यांनी आई भवानी मातेच्या मंदिरात स्पीकर साठी दहा हजाराची मदत यावेळी केली.जय भवानी नवतरुण मित्र मंडळ पाले व ग्रामस्थ मंडळ पाले यांच्या संयुक्त विद्यमानाने गेली २३ वर्षे जय भवानी मातेचा उत्सव साजरा मोठ्या उत्साह साजरा होत आहे हा उत्सव साजरा करण्यासाठी गावातील सर्व ग्रामस्थ तसेच गावातील सर्व कार्यकारी मंडळ माता भगिनी सहभागी होतात.

या उत्सवाला दरवर्षी मोठा प्रतिसाद लाभत आहे यावर्षी सुद्धा हा उत्सव साजरा करण्यासाठी गावातील ग्रामस्थ तसेच जय भवानी नवतरुण मित्र मंडळ पालेचे सर्व सभासद अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी खजिनदार सल्लागार यांनी विशेष मेहनत घेऊन हा उत्सव यशस्वीपणे, उत्साहाने साजरा केला. आई भवानी माता म्हणजे पालेगावची शान आहे. भाविक भक्तांची देवीवर श्रद्धा आहे. म्हणून हा उत्सव उत्साहाने भाविक-भक्त साजरा करतात.

# वावोशीतील शिबिरात ४५३ प्रकरणे निकाली

## शेतकऱ्यांना दाखले वाटप



**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक १ची अंमलबजावणी करणे करता खालापूर तालुक्यामध्ये ७ मार्च ते १५ मे दरम्यान मंडळ स्तरावरती खालापूर तालुक्यामध्ये एकूण सात शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. वावोशी महसूल मंडळामध्ये येथे १७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले.

तहसीलदार अभय चव्हाण यांनी सर्व उपस्थित नागरिक व लोकप्रतिनिधींना सदर अभियानाबाबत मार्गदर्शन केले तसेच उपस्थित इतर प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती सदर अभियानात देण्यात आली तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली महसुल मंडळ, वावोशी यांच्या वत्तीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर महसुल मंडळ वावोशी हरी ओम मंगल कार्यालय गोरठण बुद्रुक (वावोशी फाटा) येथे संपन्न झाला.वावोशीला महाराजस्व अभियान, तहसीलदार अभय चव्हाण, उपसभापती भाई शिंदे यांच्याकडून मार्गदर्शन,स्थानिक शेतकरी, तरुण, तरुणीना, विद्यार्थी, कामगार, महिला, निराधार, अपंग आदी सर्वच घटकांना शासकीय लाभ उपलब्ध होऊन शासकीयदाखले वाटप ही करण्यात आले आहेत, तर जातींचे प्रमाणपत्र आदी लाभ लवंकरच उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

अभियान यशस्वी करण्यासाठी नायब विकास पवार यांच्या मार्गदर्शनखाली मंडळ अधिकारी सचिन वाघ, तलाठी वावोशी, गोरठण खुर्द, नारंगी, खाणाव आदी सर्वच तालुक्यातील मंडळ अधिकारी, सर्वच तलाठी,तालुक्याचे महसूल अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, कोतवाल,सहायक, सी एस सी सेन्टर चे सर्व, छत्रपती विद्यालय वावोशी, छत्तीशी मधील सर्व ग्रामपंचायत यांनी परिश्रम घेतले. जिल्हा परिषद सदस्या रेश्मा पाटील याही उपस्थित होत्या.

# श्रीवर्धन पर्यटन संस्था आणि पोलीस ठाणे यांची संयुक्त बैठक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन पर्यटन संस्थेचे सभासद व श्रीवर्धन पोलीस ठाणे यांच्यामध्ये एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पर्यटकांकडून मद्यपान करून वाहन चालविणे, कुठेही धिंगाणा घालणे, समुद्रकिनारी मद्यपान करणे,अपघात होणे. या घटनांचे प्रमाण श्रीवर्धन मध्ये वाढले आहे. याबाबत पर्यटन संस्थेच्या सभासदांनी पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्याकडे आपले गाऱ्हाणे मांडले. यावेळी पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी उपस्थित पर्यटन संस्थेच्या सर्व सभासदांना मार्गदर्शन केले.



यावेळी पर्यटन संस्थेचे अध्यक्ष निलेश करणेकर, उपाध्यक्ष ऋषिकेश केळसकर, सर्व सदस्य, पर्यटन व्यावसायिक असलेले विद्यमान नगरसेवक देवेंद्र भुसाणे, माजी उपनगराध्यक्ष संतोष केळसकर, विवेक बंदरकर यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

आपल्या हॉटेलात आलेला कोणताही पर्यटक मद्यपान करून जर का वाहन घेऊन जात असेल तर त्वरित पोलिसांना कळवा. सदरचे वाहन पकडले जाईल व ड्रिंक अँड ड्राईव्हची केस केली जाते. अशा केसमध्ये न्यायालयाकडून दहा हजार रुपयांचा दंडदेखील करण्यात येतो. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा खाजगी हॉटेल किंवा रिसॉर्ट मध्ये देखील पर्यटक धिंगाणा घालत असतील, ऐकत नसतील तर ११२ क्रमांकावर कळवा. त्या ठिकाणी पोलीस तातडीने हजर होतील. श्रीवर्धन शहरात येणाऱ्या रस्त्यावर शुक्रवार, शनिवार नाकाबंदीदेखील सुरू करण्यात आलेली आहे.


कोणीही पर्यटक जरी गैरवर्तन करताना दिसून आले तरी कोणीही कायदा हातात घेऊ नका. ११२ क्रमांकावर अथवा पोलीस ठाण्याजवळ संपर्क साधा. यावेळी समुद्रकिनाऱ्यावरती गाड्या पार्किंग करण्यासाठी जागा कमी पडत असल्यामुळे याबाबत संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे ठरले.

# मृगगड संवर्धन मोहिमेला वेग

## पाण्याच्या टाक्यांना मिळतोय नवा श्वास

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील भेलीव गावालगत उभा असलेला ऐतिहासिक मृगगड सध्या संवर्धनाच्या दिशेने नवसंजीवनी घेताना दिसत आहे. सुमारे १७५० फूट उंचीवर वसलेला हा लहान आकाराचा पण संरक्षक दृष्टीने महत्त्वपूर्ण गड, आजही त्याच्या पाण्याच्या टाक्या, तटबंदी आणि अवशेषांमुळे इतिहासाची साक्ष देतो.



रविवार, १२ एप्रिल २०२६ रोजी 'गडकरी परिवार' आणि 'स्वयंपूर्ण सुधागड' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गड संवर्धन मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत तब्बल २५ ते ३० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत गडावरील पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्याचे महत्त्वपूर्ण काम हाती घेतले.

गेल्या काही वर्षांत दुर्लक्षित राहिलेल्या टाक्यांमध्ये साचलेला गाळ, माती आणि दगड काढून टाकण्यात आले. विशेष म्हणजे नोव्हेंबर २०२४ मध्ये स्वच्छ केलेल्या टाकीत सध्या पाण्याचा साठा झाल्याचे दिसून आल्याने स्वयंसेवकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. पाण्याची टंचाई भासत असलेल्या या गडावर जलसंधारणाचा हा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

### गडाचे वैशिष्ट्य

**मृगगडावर ५ ते ६ पाण्याच्या टाक्या, तटबंदीचे अवशेष, एक छोटी गुहा तसेच गडदेवतेची मूर्ती पाहायला मिळते. गड चढाईस तुलनेने सोपा असला तरी काही ठिकाणी अरुंद वाटा आणि खोल दऱ्या असल्याने काळजी घेणे आवश्यक आहे. कातळात कोरलेल्या पायऱ्या आणि 'चिमणी क्लाइंब' हे येथे विशेष आकर्षण आहे. पावसाळ्यात मृगगड परिसर धबधब्यांनी नटलेला दिसतो, त्यामुळे ट्रेकर्ससाठी हा गड खास आकर्षण ठरतो.**

# सीबीएसई दहावी परीक्षेत लीड स्कूल माणगावची १००% निकालाची परंपरा

**माणगाव : बातमीदार**

शैक्षणिक गुणवत्तेत अग्रेसर असलेल्या लीड स्कूल, माणगावने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या सीबीएसई (CBSE) इयत्ता १० वीच्या निकालात आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. विद्यालयाने यावर्षीही १००% निकालाची गौरवशाली परंपरा यशस्वीपणे कायम राखली असून, अनेक विद्यार्थ्यांनी ९० टयांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

गुणवत्ता यादीतील चमकते तारे शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात प्रामुख्याने खालील विद्यार्थ्यांचा समावेश आहे: अलिषा जयस्वाल: ९३.८०% (प्रथम क्रमांक), ओजल मोदी: ९३.२०%, कोमल खरोडे: ९३.००%, आयेशा पठाण: ९१.००%, जान्हवी जैन: ९१.००% यासोबतच दीक्षा कदम (८७.८०%), सर्वेश लोखंडे (८६.२०%), अश्वती आचार्य (८६.००%), श्रेया खोमणे (८५.८०%), हनी पवार (८५.२०%) आणि दुर्वेश नाईक (८५.००%) यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

केवळ एकूण टक्केवारीच नव्हे, तर विषयानुसारही विद्यार्थ्यांनी आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. सर्वेश लोखंडे आणि अलिषा जयस्वाल या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे इंग्रजी आणि हिंदी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. ही कामगिरी विद्यार्थ्यांच्या विषयावरील पकड आणि शिक्षकांचे सूक्ष्म नियोजन दर्शवते.

# गतिरोधकच्या ठिकाणी सुरक्षतेचा अभाव ; अपघाताची शक्यता

**खोपोली : प्रतिनिधी**

वाहनांची गर्दी आणि अपघात यावर काही अंशी नियंत्रण ठेवणारे म्हणून गतिरोधकांकडे पाहिले जाते. यामुळे ते अत्यावश्यक आहेत; पण ते करताना नवीन संकटे ओढवून घेण्यात आल्याचे चित्र सर्रास पाहायला मिळते. असाच प्रकार सावरोली – खारपाडा या मार्गावरील ईसांबे येथे नव्याने बनविण्यात आल्यांने गतिरोधक या ठिकाणी पहावयास मिळत आहे.



गतिरोधक ज्या ठिकाणी आहेत, त्या ठिकाणापासून चाळीस मीटर अंतरावर सुरक्षिततेचे पांढरे पट्टे असतात किंवा फलक लावण्यात आलेले असतात, पण काही ठिकाणी त्याचा अभाव दिसून येत नाही.

पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी गतिरोधक उभारले जातात. गतिरोधक हळूहळू उंचावत जाणारा व शिखरावर सपाट असलेला उंचवटा तयार करून निर्मिती झाली पाहिजे, पण ते गतिरोधक दिसत नसल्यामुळे वाहनांची त्याठिकाणी गती कमी होत नाही. यामुळे अपघात होतात.

सर्वात जास्त अपघात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात घडत असतात. काही वेळेस ज्येष्ठांना व गर्भवती स्त्रियांना याचा त्रास होत आहे.हे गतिरोधक मुख्य गर्दीच्या रस्त्यांवर गतिरोधक नसावेत.डांबराच्या पातळ पट्ट्या वापरून वाहनांचा वेग कमी करावा. यामुळे वाहनचालकाच्या चटकन लक्षात येत असल्याने हा अपघात टाळता येऊ शकतो.डांबराच्या पातळ पट्ट्या चालकांच्या लक्षात येण्यासाठी थर्मोप्लॅस्टिक रंगाने रंगविलेल्या असाव्यात आणि गतिरोधक असल्याची माहिती देणारे फलक असावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.

# कर्जत मेडिकल असोसिएशन अध्यक्षपदी डॉ. प्रशांत गांगल




**कर्जत : प्रतिनिधी**

गेली २५ वर्षे यशस्वी कारभार करणाऱ्या कर्जत मेडिकल असोसिएशनचे नवीन पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. डॉ. प्रशांत गांगल यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर असलेले मोदी रिसोर्ट येथे कर्जत मेडिकल असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा आयोजित केला होता. यावेळी माजी अध्यक्ष डॉ. मनोहर साबणे, डॉ. नीलकंठ फडके, डॉ प्रेमचंद्र जैन, डॉ हेमंत गंगोलिया, सुकानु समितीचे डॉ श्रीकांत डहाके, डॉ प्रभाकर काळे, डॉ बी. जी. लाड यांच्यासह रायगड मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित होते.

कर्जत मेडिकल असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. मिलिंद गांगल उपाध्यक्ष डॉ. रितेश जैन, सचिव डॉ. महेश शिरसाट, सह सचिव म्हणून डॉ. संजीव पाटील, खजिनदार डॉ. राहुल ओसवाल आणि सहखजिनदार म्हणून डॉ गणेश मेंगाळ यांनी पदभार स्वीकारला. नवीन कार्यकारणी पदभार स्वीकारत असताना मावळते अध्यक्ष डॉ आशिष कर्वे, सचिव डॉ जयश्री देशमुख, डॉ कुणाल राठोड, मासिकाचे संपादक डॉ. शीतल कराळेदेखील आवर्जून उपस्थित होते.

# पत्रकार शशिकांत मोरे सन्मानित

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लब या पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संघटनेचा २१वा वर्धापन दिन सोहळा तसेच पनवेल महानगर प्रेस क्लबचा पहिला वर्धापन दिन सोहळा पनवेलमधील क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे नुकताच संपन्न झाला.या सोहळ्यात डॉ.सचिन पाटील स्मृती सन्मान पुरस्काराने रोह्याचे पत्रकार शशिकांत मोरे यांना गौरविण्यात आले.

राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे, भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या उपस्थितीत डॉ.सचिन पाटील स्मृती सन्मान पुरस्कार देऊन पत्रकार शशिकांत मोरे यांना सपत्नीक गौरविण्यात आले.

यावेळी पनवेलचे महापौर नितीन पाटील, मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष राजा अदाटे, माजी सभापती बाळासाहेब पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण आदी उपस्थित होते.

दरम्यान, रायगड प्रेस क्लबच्या वतीने देण्यात आलेल्या या मानाच्या सन्मान पुरस्काबद्दल मोरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# साळावच्या जिंदल विद्यामंदिर येथे अग्निसुरक्षा प्रात्यक्षिक व प्रशिक्षण

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे विद्यार्थ्यांसाठी अग्निसुरक्षा विषयावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सत्र उत्साहात पार पडले. इयत्ता १ली ते १२वीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या प्रशिक्षणासाठी जेएसडब्ल्यू ग्रीन स्टील, साळाव येथील अग्निसुरक्षा विभागातील तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. उपव्यवस्थापक अभिषेक कुलश्रेष्ठ तसेच रवी पाटील यांनी विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षेबाबत सविस्तर माहिती दिली.

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना आग कशी लागते, ज्वाळांचे प्रकार तसेच आगीचे विविध प्रकार याबाबत सोप्या व समजण्यासारख्या पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच अग्निशामक यंत्रांचे विविध प्रकार व त्यांचा योग्य वापर कसा करावा याची माहिती देण्यात आली. विशेष आकर्षण ठरले ते प्रत्यक्ष प्रात्यक्षिक. विद्यार्थ्यांसमोर अग्निशामक यंत्राचा वापर कसा करावा याचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद कसा द्यावा याचे ज्ञान मिळाले.

शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी शिकलेल्या गोष्टींचा दैनंदिन जीवनात उपयोग करावा, असे आवाहन केले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी उपप्राचार्य मंगेश बमनोटे तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता.

# अक्षय्य तृतीया आणि ग्रीष्म ऋतुचर्या

या अगोदरच्या लेखामध्ये आपण वसंत ऋतूबद्दल वाचलं असेल, आता आपण ग्रीष्म ऋतू (अक्षय्य तृतीया) याबद्दल जाणून घेऊयात. अक्षय्य तृतीया हा काळ आयुर्वेदानुसार ग्रीष्म ऋतुच्या (उन्हाळ्याच्या) प्रारंभाचा मानला जातो. या काळात सूर्याचे तेज वाढल्याने शरीरातील ओळावा (कफ) कमी होऊन पित्त आणि वात वाढण्यास सुरुवात होते. त्यामुळे या दिवसातील विधी आणि आहार हे प्रामुख्याने शरीराला थंडावा देण्यासाठी आणि व्याधीपासून वाचवण्यासाठी आखलेले आहेत.



अक्षय्य तृतीयेचे महत्त्व – हा हिंदूंचा अत्यंत पवित्र असा साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहेच, याचबरोबर तो आयुर्वेदाच्या दृष्टीने आरोग्य जपण्याचा काळ आहे. ऋतुचर्या पालन – सौर ग्रीष्म ऋतूप्रारंभ हा काळ ग्रीष्म ऋतूचा असल्याने शरीराचे बल कमी होते.

अक्षय्य तृतीयेला केल्या जाणाऱ्या "पाणी दान किंवा कलश दान" यामागे शरीरातील उष्णता कमी करण्याचा संदेश आहे. ग्रीष्म ऋतू हा आदान काळामध्ये येतो या काळात सूर्याची तीव्रता जास्त असल्यामुळे शरीरातील ओज व बल कमी होते.

दोष अवस्था : पित्त प्रकोप होतो वमन संचय व कफक्षय होतो. उष्ण (गरम), वृक्ष (कोरडा), लघु (हलक) यामुळे शरीरात दाह, तृष्णा, क्लाती वाढते. आरोग्य आणि आहार (आयु दृष्टिकोन) अक्षय्य तृतीयेला यव (जव)पासून बनवलेले पदार्थ, जसे की सत्तू (भाजलेल्या जवाची पिठळी) आणि गुळ खाणे अत्यंत पौष्टिक व आरोग्यदायी मानले जाते. कडक उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी थंडपेय, कैरीचे पन्हे आणि वाळ्याचे पाणी पिणे हितावह आहे. Electrolytes म्हणून काम करतात. अक्षय्य तृतीया आणि आयुर्वेद आरोग्य समृद्धी आणि संतुलनाचा उत्सव सत्तू चे महत्व (यव) – या दिवशी जव (Barley) किंवा गव्हाचे सत्तू खाण्याची परंपरा आहे.

आयुर्वेद सांगते की जव हे स्वभावता: शितल असून पचायला हलके असतात, ज्यामुळे उन्हाळ्यातील अग्नी (पचनशक्ती) मंद असताना शरीराला ऊर्जा मिळते. उष्णतेचे विकार (Heat Related Issues) सतत घाम आल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे (Dehydration) चक्कर येणे किंवा उष्माघात (Heat Stroke) होणे. पाचक व्याधी (Digestive Issues) पित्त वाढल्याने पित्ताचा त्रास छातीत जळजळ, आम्लपित्त (Acidity) आणि भूक मंदावणे अशा समस्या जाणवतात. त्वचेचे विकार (Skin Problems) घामामुळे घामोळया, खाज पुरळ येणे किंवा त्वचेवर लाल चंटके पडणे या व्याधी उद्भवतात. प्रतिबंधात्मक उपाय आहार – आहारात बेल फळाचे सरबत, शहाळ्याचे पाणी आणि थंड पदार्थाचा समावेश करावा.

विधी – अभ्यंगस्नान आणि वाळ्याच्या पाण्याचे स्नान केल्याने त्वचेचे आरोग्य टिकून राहते आणि उष्णता कमी होते. वर्ज्य – या काळात तिखट मसालेदार आणि अति उष्ण पदार्थ खाणे टाळावे जेणेकरून पित्ताचा प्रकोप होणार नाही.

ऋतू आणि आयुर्वेद अक्षय्य तृतीया ही ग्रीष्म ऋतूत येते. आयुर्वेदानुसार या काळात पित्त दोष वाढतो. शरीरातील ओज कमी होतो . जलक्षय (Dehydration) होण्याची शक्यता वाढते म्हणून शरीराला शीतलता देणारे पोषक आणि पचनास हलके आहार विहार आवश्यक असतात. आहार (Diet) काय घ्यावे? शितल व पौष्टिक पदार्थ तांदूळ भात,गहू– दूध, तूप– साखर, गुळ, नारळ पाणी, आमरस (मर्यादित प्रमाणात) योग्य पद्धतीने बनवलेला आंब्याचा रस पौष्टिक + पित्त संतुलित + बलवर्धक असतो. अक्षय्य तृतीयेला आंबे खाण्याची परंपरा महाराष्ट्रात सुरू होते. आमरस कसा बनवायचा आयुर्वेदिक पद्धतीने आमरसामध्ये सुंठ + तूप हे अत्यंत महत्त्वाचं आहे. सुंठ आणि तूप नाही घातले, तर तो बाधू शकतो, जुलाब होऊ शकतात, उष्ण पडू शकतो.

सुंठ उष्ण असूनसुद्धा विपाक मधुर आहे, म्हणून ते पित्तशामक आहे. द्राक्ष, खजूर टाळावे तिखट मसालेदार पदार्थ अति तेलकट, उष्ण, अन्न, मध्यपान. विहार (Lifestyle) दुपारी उन्हात जाणे टाळावे. हलका व्यायाम योग्य व पुरेशी झोप. थंड वातावरणात विश्रांती.

आयुर्वेदिक उपचार व रसायन : अक्षय्य तृतीया हा रसायन सेवन सुरू करण्यासाठी उत्तम दिवस मानला जातो उपयोगी रसायने आमलकी रसायन, गुडूची (गीलोय), शतावरी, ब्राम्ही हे औषध शरीराची रोगप्रतिकारक शक्ती (Immunity) वाढवतात व ओज वाढवतात. पुढच्या सणासाठी एकत्र राहू असेच लेख वाचत राहा.

अक्षय्य तृतीया हा केवळ धार्मिक सण नसून आरोग्य जपण्याचा उत्तम काळ आहे. या काळात वाढलेल्या उष्णतेमुळे शरीरातील पित्त व द्रव संतुलन बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे योग्य आहार विहार थंड व पौष्टिक पदार्थांचे सेवन आणि आयुर्वेदिक उपाय याचा अवलंब केल्यास शरीर निरोगी राहते.

अशा प्रकारे आयुर्वेदाच्या तत्त्वाचे पालन करून आपण या सणाचा आनंद घेतानाच आपले आरोग्यही टिकवू शकतो. त्यामुळे आयुर्वेदात सांगितलेल्या ऋतूचर्येचे पालन करणे हे निरोगी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आयुर्वेदात स्वास्थ टिकून राहण्यासाठी या काळात निरोगी व्यक्तीनेदेखील वैद्याच्या सल्ल्याने पंचकर्मे जरूर करावीत. यामुळे पुढील रोगांना आळा बसतो.

**–प्राजक्ता मच्छिंद्र जाधव,**
**आयुर्वेदाचार्य, सुखम हॉस्पिटल,**
**तक्का, पनवेल**

# गुजरातची कोलकातावर सरशी

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

कगिसो रबाडा आणि मोहम्मद सिराजच्या भेदक माऱ्यानंतर कर्णधार शुबमन गिलच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या जोरावर गुजरात टायटन्सच्या संघाने घरच्या मैदानात कोलकाता नाईट रायडर्सला पाच विकेट्स आणि दोन चेंडू राखून पराभूत केले.



कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना साई सुदर्शन १६ चेंडूत २२ धावा करून परतला. जोस बटलची खेळी १५ चेंडूत २५ धावांच्या खेळीवरच थांबली असताना कर्णधार शुबमन गिलने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने ५० चेंडूत आठ चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ८६ धावा करत सामना गुजरातच्या बाजूने सेट केला. त्याच्याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने १३ चेंडूत १३ धावा, तर ग्लेन फिलिप्सने १६ चेंडूत १९ धावा करून मैदान सोडल्यावर राहुल तेवतिया ७ (६) आणि शाहरुख खान ३ (२) यांनी गुजरातचा विजय निश्चित केला. कोलकाताच्या संघाकडून वरुण चक्रवर्तीनं सर्वाधिक दो, तर रमनपदीप सिंग, सुनील नरेन आणि वैभव अरोरा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली

तत्पूर्वी पहिल्यांदा फलंदाजी करताना कोलकाता नाईट रायडर्सची सुरुवात खराब झाली. पहिल्याच षटकात मोहम्मद सिराजने कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेला 'गोल्डन डक'सह तंबूचा रस्ता दाखवला. तिसऱ्या षटकात अंगकृष रघुवंशी चार चेंडूत आठ धावांवर, तर टिम सिफर्ट १४ चेंडूत १९ धावांवर कगिसो रबाडाच्या जाळ्यात अडकले. पॉवरप्लेमध्ये चौथ्या षटकात कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने ३२ धावांवर तीन विकेट्स गमावल्या होत्या.

संघ अडचणीत असताना केकेआरच्या ताफ्यातील सर्वात महागडा खेळाडू (२५.२० कोटी) कॅमरून ग्रीन आणि रोव्हमन पॉवेल जोडी जमाली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ४२ चेंडूत ५५ धावांची भागीदारी रचत कोलकाता नाईट रायडर्सचा डाव सावरला. पॉवेल २० चेंडूत २७ धावा करून परतल्यावर ग्रीन-अनुकूल रॉय यांनी पाचव्या विकेटसाठी २३ चेंडूत ६० धावांची भागीदारी रचत ही लढाई २०० पार करण्याचे संकेत दिले, पण त्यानंतर एकाही बॅटरला मोठे फटकेबाजी करताना आली नाही. ग्रीनने ५५ चेंडूत सात चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने केलेल्या ७९ धावांच्या खेळीच्या जोरावर कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने निर्धारित २० षटकात सर्वबाद १८० धावांपर्यंत मजल मारली.

## स्मृती मानधना ठरली 'टी-२० क्वीन'

**डर्बन : वृत्तसंस्था**



भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना हिने जागतिक क्रिकेटमध्ये आपल्या नावाचा नवा दबदबा निर्माण केला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध डर्बन येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात स्मृतीने एक असा टप्पा गाठला, जो आतापर्यंत कोणत्याही भारतीय पुरुष किंवा महिला क्रिकेटपटूला शक्य झाला नव्हता. या सामन्यात अवघ्या १३ धावा करूनही स्मृतीने रोहित शर्माचा सर्वाधिक धावांचा विक्रम मोडीत काढला आहे.

**रोहित शर्माचा मोठा विक्रम मोडला**

भारतीय पुरुष संघाचा माजी टी-२० कर्णधार रोहित शर्माने आपल्या कारकिर्दीत १५९ सामन्यांत चार हजार २३१ धावा केल्या होत्या. स्मृती मानधनाने आता १६१ सामन्यांमध्ये चार हजार २४४ धावा पूर्ण करून रोहितचा विक्रम मोडला हे. यामुळे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (पुरुष आणि महिला दोन्ही गटात) भारतासाठी सर्वाधिक धावा करणारी खेळाडू म्हणून आता स्मृतीचे नाव अव्वल स्थानी कोरले गेले आहे.

महिला टी-२० क्रिकेटचा विचार करता स्मृती मानधना आता जगातील दुसरी सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली आहे. या यादीत न्यूझीलंडची सुझी बेट्स (४,७१७ धावा) पहिल्या क्रमांकावर आहे, तर भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर ३,८६९ धावांसह तिसऱ्या क्रमांकावर विराजमान आहे.

## ट्रीसा-गायत्री जोडीची उबर चषक स्पर्धेतून माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॅडमिंटनमधील भारताची आघाडीची जोडी असलेल्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी आगामी उबर चषक फायनल्स स्पर्धेतून माघार घेतली आहे. ट्रीसाला घोट्याची दुखापत झाल्याने हा निर्णय भारतीय जोडीला घ्यावा लागला. यामुळे डेन्मार्क येथे होणाऱ्या या स्पर्धेपूर्वीच भारताला धक्का बसला आहे.



डेन्मार्कच्या हॉर्सन्स येथे २४ एप्रिल ते ३ मे या कालावधीत थॉमस आणि उबर चषक फायनल्स स्पर्धा होणार आहे. भारतीय पुरुष आणि महिला संघ 'अ' गटात आहेत. यापूर्वी २०२२मध्ये ऐतिहासिक विजेतेपद पटकावणाऱ्या पुरुष संघाचा गतविजेत्या चीन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासह एकाच गटात समावेश आहे. भारतीय महिला संघाचा सामना १६ वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या चीनसह यजमान डेन्मार्क आणि युक्रेनशी होईल.

आता भारतीय बॅडमिंटन महासंघाने उबर चषकासाठी ट्रीसा-गायत्रीच्या अनुपस्थितीत श्रुती मिश्रा आणि प्रिया कोंजेंगबाम यांची दुहेरीतील बदली खेळाडू म्हणून निवड केली आहे. श्रुती आणि प्रिया या २०२३च्या राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या आहेत.

## राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा | आता रंगणार उपांत्य फेरीचा थरार

**ठाणे : प्रतिनिधी**

श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत महिलांमध्ये ओम् वर्तकनगर, स्वराज्य स्पोर्ट्स, विवेक स्पोर्ट्स, मिडलाईन यांनी, तर पुरुषांमध्ये श्रीराम विश्वस्त, जय हनुमान, डॉन बॉस्को, मिडलाईन यांनी उपांत्य फेरी गाठण्याचा मान पटकविला.

ठाणे चरई येथील श्री मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर सुरू असलेल्या चौथ्या दिवशी महिलांच्या उपांत्यपूर्व सामन्यात ठाण्याच्या ओम् वर्तकनगरने ठाण्याच्या जय भारत स्पोर्ट्सचा ४१-१४ असा धुव्वा उडवित आगेकूच केली. सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत पूर्वार्धात दोन लोण देत २५-०६ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत सामन्यावरील पकड घट्ट करीत मोठ्या फरकाने सामना खिशात टाकला. वैष्णवी साळुंखे, पूर्वा इंगवले, पूजा जाधब यांचा चतुरस्त्र खेळ या विजयात महत्त्वाचा ठरला. जय भारतची श्रेया गावंड एकाकी लढली.

दुसऱ्या सामन्यात उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्सने मुंबईच्या बलाढ्य अशा शिवशक्ती महिला संघाचा प्रतिकार ३५-३३ असा मोडून काढला. पहिल्या डावात १०-२० अशा १० गुणांनी पिछाडीवर पडलेल्या स्वराज्यने दुसऱ्या डावात जोरदार मुसंडी मारत विजयश्री खेचून आणली. सानिका चौघुले, याशिका पुजारी यांच्या तुफानी चढायांना समृद्धी मोहिते, प्रतीक्षा तांडेल यांची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे स्वराज्यने विजय मिळविला. शिवशक्तीच्या शुभदा खोत, ऋणाली भुवड, पौर्णिमा जेधे यांचा पहिल्या डावातील जोश दुसऱ्या डावात टिकला नाही.



ठाण्याच्या विवेक स्पोर्ट्सने रायगडच्या कर्नाळा स्पोर्ट्सला ३९-१६ असे नमवित उपांत्य फेरी गाठली. विश्रांतीपर्यंतच्या खेळात एक लोण देत १९-०९ अशी आघाडी घेणाऱ्या विवेकने विश्रांतीनंतर आणखी दोन लोण देत आपला विजय सोपा केला. स्वीटी, तन्नू, हरजीत, सनाया यांनी विवेक स्पोर्ट्सकडून उत्कृष्ट खेळ केला. कर्नाळा स्पोर्ट्सच्या अंकिता घारे, तेजा सपकाळ बऱ्या खेळल्या.

शेवटच्या सामन्यात मिडलाईन अकॅडमीने मध्यंतरातील २१-२२ अशा एका गुणाच्या पिछाडीवरून शिवमुद्रा स्पोर्ट्सला ३९-३७ असे चकवीत उपांत्य फेरी गाठली. हर्षा शेट्टी, मोक्ष पुजारी, सिद्धी यांच्या संयमी खेळाला याचे श्रेय जाते. शिवमुद्राच्या रितिका फुलसुंगे, दिव्या रावत, साक्षी रहाटे यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी पडला.

पुरुषांच्या उपांत्यपूर्व सामन्यात मुंबईच्या श्रीराम विश्वस्तने उपनगरच्या स्वस्तिक मंडळाचा ३१-२० असा पाडाव केला. तुषार शिंदे, अंकुश पारले, आदित्य पारले यांच्या जोशपूर्ण खेळाला या विजयाचे श्रेय जाते. अक्षय बरडे, ऋत्विक कांबळी यांचा खेळ स्वस्तिकला विजय मिळवून देण्यात कमी पडला. ठाण्याच्या जय हनुमानने उपनगरच्या सिद्धार्थ मंडळावर २७-२१ अशी मात केली.

पूर्वार्धात लोण देत १५-०३ अशी आघाडी घेणाऱ्या जय हनुमानला उत्तरार्धात सिद्धार्थने कडवी लढत दिली. उत्तरार्धात सिद्धार्थने टॉप गिअर टाकत लोणची परतफेड करीत सामना रंगतदार केला, पण संघाला विजयी करण्यात ते अपयशी ठरले. ओम् सिंग, गौरव पाटील, राज पाटील यांच्या चढाई पकडीच्या खेळाने जय हनुमानने हा विजय साकारला. नरेश, अंकित लढत यांनी सिद्धार्थकडून लढत दिली.

ठाण्याच्या डॉन बॉस्कोने जीत सिंग, अनिकेत पाटील, विनायक गवारे यांच्या झंझावाती खेळाच्या जोरावर ठाण्याच्या विवेकस्मृती संघाला ३७-१५ असे नमविले. विवेकस्मृतीचा रोहन पाटील चमकला. शेवटच्या चुरशीने खेळल्या गेलेल्या सामन्यात नांदेडच्या मिडलाईनने जय हनुमानला ३८-३१ असे चकविले. विश्रांतीला १८-१९ अशा पिछाडीवर पडलेल्या मिडलाईनने नंतर मात्र जोशपूर्ण खेळ करीत विजय साकारला. धीरज बैलमारे, पवन आडे, कल्पेश भाखे यांच्या धूर्त खेळाला या विजयाचे श्रेय जाते. जय हनुमानच्या ओम् सिंग, वैभव मोरे, परेश नाखरे यांचा खेळ विश्रांतीनंतर थंडावला.

## 'भारत पेट्रोलियम'ने ओम् ज्ञानदीप चषक जिंकला

**मुंबई : प्रतिनिधी**

ओम् ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम संघ अंतिम विजेता ठरला. भारत पेट्रोलियम संघाचा अनिल जस्ता स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला फॅशन प्रो मोटार बाईक देऊन गौरविण्यात आले.



मुंबईच्या आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील स्व. अमित वजराटकर क्रीडानगरीतील मॅटवर झालेल्या अंतिम सामन्यात भारत पेट्रोलियमने पूर्वार्धातील १५-२१ अशा पिछाडीवरून युवा पलटनचा कडवा प्रतिकार ४३-३९ असा मोडून काढत रोख रु. एक लाख पन्नास हजार व ओम् ज्ञानदीप चषक आपल्याकडे खेचून आणला. उपविजेत्या युवा पलटनला चषक व रोख रु. एक लाखवर समाधान मानावे लागले.

युवा पलटनने पहिल्याच चढाईत गुण घेत आश्वासक सुरुवात केली. सलग तीन गुण गमावल्यानंतर पेट्रोलियमने पकड करीत पहिला गुण घेतला, पण युवाच्या किशन जाट यांने एकाच चढाईत तीन गडी टिपत सातव्या मिनिटाला पेट्रोलियम वर पहिला लोण दिला आणि १०-०३ अशी आघाडी घेतली. विश्रांतीला २१-१५ अशी युवा पलटनकडे आघाडी होती, पण उत्तरार्धात पेट्रोलियामच्या अनिल जस्ता, मिलन दहिया यांनी जोरदार आक्रमण करीत संघाला विजय मिळवून दिला. प्रदीप दिघोळ यांनी उत्कृष्ट पकडी घेत त्यांना उत्तम साथ दिली. किशोर जाट, नीरज मिसळ, अलंकार पाटील यांनी पूर्वार्धात जोशपूर्ण खेळ करीत युवाला आघाडी मिळवून देण्यात महत्त्वाचा खेळ केला, पण उत्तरार्धात ते ढेपाळले. म्हणून युवला पराभवाचा सामना करावा लागला. असलम इनामदारची उणीव त्यांना जाणवली.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात भारत पेट्रोलियमने मुंबई पोस्टलला ४०-३९ असे, तर युवा पलटनने ठाणे महानगर पालिकेला ४७-३६ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी चषक व रोख रु. पन्नास हजार देऊन सन्मानित करण्यात आले.

युवा पलटनचे अनिल जाट व अलंकार पाटील हे स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचे खेळाडू ठरले. दोघांना प्रत्येकी वॉशिंग मशिन देऊन गौरविण्यात आले. प्रतिदिनी उत्कृष्ट ठरणाऱ्या खेळाडूस एलईडी टीव्ही देऊन गौरविण्यात आले.

## आरसीबी संघाने इतिहास रचला

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शनिवारी (दि.१८) दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना खेळवला गेला. आरसीबीचा संघाने एम चिन्नास्वामी मैदानावर खेळण्यासाठी उतरताच मोठा विक्रम केला आहे. आयपीएल इतिहासात हा मोठा पराक्रम करणारा आरसीबी पहिला संघ ठरला आहे.

एम. चिन्नास्वामी स्टेडियम हे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे घरचे मैदान आहे. या स्टेडियमवर आरसीबी संघ दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध शनिवारी १००वा सामना खेळण्यासाठी उतरला आहे. एकाच मैदानावर एवढे आयपीएल सामने खेळणारा आरसीबी पहिला संघ ठरला आहे.

## डगआऊटमध्ये मोबाईल वापरणे महागात!

### राजस्थान रॉयल्सच्या व्यवस्थापकाला एक लाखांचा दंड

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या रणधुमाळीत नियमांचे उल्लंघन करणे राजस्थान रॉयल्सच्या टीम मॅनेजरला महागात पडले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यादरम्यान डगआऊटमध्ये मोबाईल फोनचा वापर केल्याप्रकरणी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) राजस्थान रॉयल्सचे व्यवस्थापक रोमी भिंडर यांच्यावर कडक कारवाई करत एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

गुवाहाटी येथील बरसापारा स्टेडियमवर पार पडलेल्या राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यातील या सामन्यादरम्यान रोमी भिंडर डगआऊटमध्ये बसून फोन वापरताना कॅमेऱ्यात कैद झाले होते. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर बीसीसीआयने याची गंभीर दखल घेतली. आयपीएलच्या भ्रष्टाचारविरोधी नियमांनुसार 'पीएमओए' क्षेत्रात म्हणजेच डगआऊटमध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी या कारवाईला दुजोरा दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, अँटी-करप्शन युनिट रोमी भिंडर यांनी दिलेल्या उत्तरावर समाधानी नाही. भिंडर यांनी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत फोन वापरल्याचे स्पष्टीकरण दिले होते. नियमानुसार संघ व्यवस्थापक ड्रेसिंग रूममध्ये फोन वापरू शकतात, मात्र डगआऊटमध्ये तो वापरणे प्रोटोकॉलचे उल्लंघन मानले जाते.

सैकिया यांनी पुढे सांगितले की, रोमी भिंडर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे चौकशीत समोर आले आहे. त्यांना आपली बाजू मांडण्यासाठी ४८ तासांचा वेळ देण्यात आला होता, मात्र त्यांचे स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने त्यांना एक लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. हे त्यांचे पहिलेच उल्लंघन असल्याने त्यांना केवळ आर्थिक दंड आणि ताकीद देऊन सोडण्यात आले आहे; अन्यथा त्यांच्यावर बंदीची कारवाईदेखील होऊ शकली असती.

## विराटच्या लाईक-अनलाईकवर जर्मन मॉडेलने सोडले मौन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली सध्या आयपीएलमध्ये आपल्या फलंदाजीने मैदान गाजवत आहे, मात्र सध्या एका प्रकरणामुळे विराट कोहलीची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. काही महिन्यांपूर्वी विराट कोहलीने अवनीत कौरचा फोटो लाईक केला होता, ज्यावर विराटने तांत्रिक बिघाड आणि अल्गोरिदमची अडचण असल्याचे म्हटले होते. आता पुन्हा एकदा विराटने जर्मन इन्फ्लुएन्सर लिजलैज हिचा फोटो लाईक केल्याने चर्चांना उधाण आले आहे. या सर्व प्रकरणावर आता स्वतः लिजलैजने मौन सोडले आहे.



लिजलैजने सांगितले की, विराटने तिचा फोटो लाईक केल्याची गोष्ट तिला स्वतःलाही माहित नव्हती. ती म्हणाली, ही खूपच आश्चर्याची गोष्ट होती. मी सकाळी झोपेतून उठले तेव्हा माझ्या बातम्या सगळीकडे होत्या. विराटने फोटो कधी लाईक केला हे मला माहीत नव्हते, मला बातम्यांमधूनच हे सर्व समजले. अनेकांनी मला मेसेज केले आणि माझ्या डीएममध्ये याबद्दलचे आर्टिकल पाठवले. लोक या गोष्टीमुळे खूप उत्साही होते.

विराटने फोटो लाईक केल्यानंतर काही वेळातच तो 'अनलाईक' केला. यावर लिजलैज म्हणाली, "खरं सांगायचं तर मला त्याच्यासाठी थोडं वाईट वाटलं! त्याने फोटो लाईक केला याचा मला आनंदच होता, पण नंतर त्याने तो अनलाईक केला. ही गोष्ट इतकी मोठी बातमी कशी बनू शकते आणि लोकांनी इतक्या लवकर हे कसं नोटीस केलं, हेच मला समजलं नाही. कदाचित त्याचा तसा कोणताही हेतू नसेल, तरीही त्याने दिलेल्या सपोर्टबद्दल मी त्याची आभारी आहे.

लिजलैज ही एक जर्मन-दक्षिण आफ्रिकन सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर, कंटेंट क्रिएटर आणि मॉडेल आहे. ती उत्तम गायिका असून ट्रॅव्हल व्लॉग्सही बनवते. विशेष म्हणजे तिला भारतीय संस्कृतीबद्दल आकर्षण आहे.

## तान्या चौधरी शेतात गाळतेय घाम!



**बागपत : वृत्तसंस्था**

खेळात यश मिळवण्यासाठी केवळ कौशल्यच नाही, तर प्रचंड कष्ट करण्याची तयारी लागते, हे बागपतच्या तान्या चौधरीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. आशियाई चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून देशाचे नाव उंचावणारी तान्या सध्या आपल्या कुटुंबाला शेतात मदत करताना दिसत आहे, मात्र तिची नजर आता २०२६मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल खेळांतील पदकावर आहे.

उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्याची कन्या तान्या चौधरी ही मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील आहे. मैदानावर सराव केल्यानंतर उरलेल्या वेळेत तान्या आपल्या वडिलांना शेतीकामात मदत करते. सकाळी पहाटे सराव आणि त्यानंतर दुपारच्या कडक उन्हात शेतात काम असा तिचा दिनक्रम आहे.

"माझे वडील माझ्यासाठी खूप कष्ट करतात, त्यांना मदत करणे माझे कर्तव्य आहे, पण माझे स्वप्न भारतासाठी राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणे हेच आहे," अशा शब्दांत तान्याने आपला निर्धार व्यक्त केला.तानियाने यापूर्वी हॅमर थ्रो प्रकारात आपल्या कामगिरीने सर्वांना थक्क केले आहे. आता ती आगामी राष्ट्रकुल स्पर्धेसाठी कसून सराव करत आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तिने आपल्या तंत्रात सुधारणा केली असून भारताला या प्रकारात पदक मिळवून देण्याचा तिचा मानस आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com